१०३ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, बुधवार ४ मार्च, २०२६ • वर्ष-१०३, अंक-३५८, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 103, Issue - 358 Marathi - Daily - Mumbai, 4 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

## २५ दिवस पुरेल इतका भारताजवळ तेलसाठा

**नवी दिल्ली-** भारताकडे सध्या कच्चे तेल आणि इंधनाचा साठा सुमारे २५ दिवस पुरेल इतका आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली असून, मध्य पूर्वेत तणाव वाढत असल्याने कच्चे तेल, एलपीजी आणि एलएनजी आयातीसाठी पर्यायी देशांचा शोध घेतला जात आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने काल हॉर्मुझ सामुद्रधुनी जहाजवाहतुकीसाठी बंद असल्याचे जाहीर केले. या महत्त्वाच्या जलमार्गातून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही जहाजाला आग लावली जाईल, असा इशारा इराणी सरकारने दिला आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांना लक्ष्य केले. यामुळे जागतिक तेलाच्या किमती सलग तिसऱ्या दिवशी वाढल्या. मध्य पूर्वेतून तेल पुरवठा खंडित होण्याची शक्यता असल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

## रत्नागिरीत येणारी तेल कंपनी अरामकोवर इराणचा हल्ला



**जगातील बड्या खासगी तेल शुद्धीकरण कंपन्यांपैकी एक असलेल्या सौदी अरेबियातील अरामको रिफायनरी या कंपनीवर काल इराणने मोठा ड्रोन हल्ला केला. या ड्रोन हल्ल्यानंतर कंपनीत आग लागल्याने तेल पुरवठा ठप्प झाला आहे. याचा परिणाम अनेक देशांवर होणार आहे. इराणचे तेलावरील नियंत्रण कमी करण्यासाठी अमेरिकेने इस्त्रायलला मदत करीत या इराण विरोधातील युद्धात उडी घेतली आहे. याचा वचपा काढण्यासाठीच इराणने सौदी अरेबियातील अरामको या सर्वात मोठ्या तेल कंपनीवर हल्ला केला. आज या हल्ल्याची हवाई छायाचित्रेही त्यांनी जारी केली. ही छायाचित्रे पाहता हा कारखाना पूर्ण उद्ध्वस्त झाल्याचे दिसते. मात्र काही वेळातच आग आटोक्यात आणून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात आले, असे अरामको कंपनीच्या वतीने सांगण्यात येत आहे.**

■ रियाध

**हीच** अरामको कंपनी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू किंवा सोयगाव येथे तेल शुद्धीकरण प्रकल्प उभारणार आहे. हा प्रकल्प पहिल्यांदा नाणार येथे उभारण्यात येणार होता. मात्र स्थानिकांच्या विरोधामुळे हा प्रकल्प नाणारमधून हलवण्यात आला. त्यानंतर तो बारसूला हासविण्याचा निर्णय झाला. मात्र तिथेही त्याला कडाडून विरोध झाला. या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित » पान ६ वर

# चीन, ब्रिटन आणि स्पेनचा इराणला जाहीर पाठिंबा

# अमेरिकेचे तळ उद्ध्वस्त! अमेरिकेची शस्त्रास्त्र संपली!

■ तेहरान

**आज** ब्रिटन व स्पेनने इराणला पाठिंबा जाहीर केला. आम्ही या युद्धात अमेरिका व इस्त्रायलला कोणतीही मदत करणार नाही, असे या दोन्ही राष्ट्रांनी सांगितले. चीनने परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी ओमान, फ्रान्स व इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी संपर्क साधून चर्चा केली. त्यानंतर इराणला पाठिंबा जाहीर करीत त्यांनी अमेरिका व इस्त्रायलला युद्ध तात्काळ थांबविण्याचा इशाराच दिला. दरम्यान, आज दुसऱ्याही बाजूने अमेरिका अडचणीत आली आहे. इस्त्रायलला मदतीसाठी इराणवर हल्ला करण्याच्या दृष्टीने अमेरिकेने सौदी अरेबियाच्या भागात अनेक ठिकाणी हवाई व नौदल तळ निर्माण करून तिथे लढाऊ विमाने व जहाजे आणून ठेवली होती. मात्र इराणवर हल्ला होताच इराणने चाणाक्षपणे अमेरिकेचे हे तळ उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली. आज बिरशेवा, बाहरीन, रियाध, दुबई, अबूधाबी, कतारवर इराणने पुन्हा जबरदस्त क्षेपणास्त्र डागली. यामुळे तेथील अमेरिकेचे तळ उद्ध्वस्त झाले. आता इराणवर हल्ला करण्यासाठी शस्त्रास्त्रे नाहीत, असे आज ट्रम्प यांनी कबूल केले आहे. अमेरिकन तळांवर इराणने केलेले हल्ले इतके ताकदवान होते की, अमेरिकेने अखेर तेथील सैनिकांना माघारी बोलावले. जॉर्डन, बहारीन येथील अमेरिकी दुतावासावर हल्ले झाल्याने अमेरिकेने तेथील अधिकाऱ्यांनाही परतण्यास सांगितले. राष्ट्राध्यक्ष डोनॉल्ड ट्रम्प व सचिव मार्को रुबियो म्हणाले की, आमची पूर्ण तयारी आहे. » पान २ वर

**इस्त्रायल आणि अमेरिकेने पूर्ण तयारीनिशी इराणवर ताकदीने हल्ला करीत युद्ध छेडले. यामुळे इराण दोन दिवसांत शरणागती पत्करेल, अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र हे युद्ध सुरू होऊन चार दिवस झाले तरी इराणने माघार घेतलेली नाही. उलट आज चीन, ब्रिटन आणि स्पेन या तीन राष्ट्रांनी इराणला पाठिंबा जाहीर केला. आमच्या हवाई हद्दीतून जायचे नाही, असे स्पेनने अमेरिकेला स्पष्ट बजावले. यामुळे हे युद्ध दीर्घकाळ सुरू राहणार हे स्पष्ट झाले आहे. याचा थेट परिणाम तेलाच्या पुरवठ्यावर होणार आहे. तेलाचे भाव आताच वाढले आहेत. भारताला तेलपुरवठ्याची अडचण निर्माण झाली असून आता पुन्हा रशियाकडून तेल घ्यावे का? याचा विचार सुरू झाला आहे.**



### अमेरिकेने स्वार्थासाठी सरकारे उलथवली

**२००१-** अल कायदा प्रमुख ओसामा बिन लादेनने अमेरिकेवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला करून नंतर लादेनला ठार केले.

**२००३ -** इराकच्या तेल साठ्यांवर कब्जा करण्यासाठी सद्दाम हुसेनवर जैविक अस्त्र तयार करीत असल्याचा खोटा आरोप करून इराकवर हल्ला करत शेवटी सद्दामका फाशी दिली.

**२०११ -** लिबियातील तेलसाठे काबीज करण्यासाठी लिबियातील बंडखोरांना मदत करून मुअम्मर गद्दाफी सरकार उलथवून गद्दाफीना ठार मारले

**२०१३-** इजिप्तचे मोर्सी सरकार पाडले. मोर्सी यांचे मध्यपूर्वेतील वर्चस्व मोडून काढायचे होते.

**२०१४ -** युक्रेनचे व्हिक्टर यनुकोव्हच यांनी रशियाबरोबर संबंध सुधारायला सुरुवात करताच त्यांचे सरकार पाडले.

**२०१७-** इराण व रशियाचे वर्चस्व मोडीत काढायला सिरीयाचे असद सरकार उलथवून अमेरिकेच्या मर्जीतील सरकार स्थापन केले.

**२०१९ -** लिथियमचे सर्वाधिक साठे असलेल्या बोलिवियातील इवा मोरालेस यांचे सरकार उलथवून टाकले.

### अमेरिकेला जगाचा हुकूमशहा बनायचे आहे

जेफ्री सॅच या अमेरिकन अर्थशास्त्र तज्ज्ञाने म्हटले की, इराणला कधी अणुबॉम्ब तयार करायचाच नव्हता. पण तरीही हे कारण देऊन हा हल्ला करण्यात आला. अमेरिकेतील तीन तृतियांश नागरिकांचा विरोध आहे. नेतान्याहू म्हणाले की, या भागात इस्त्रायलचे वर्चस्व असावे हे त्यांचे ४० वर्षांचे स्वप्न आहे. अमेरिकेला जागतिक वर्चस्व हवे आहे. यासाठीच हे दोघे एकत्र आले आणि पूर्ण नियोजन करून या दोघांनी हल्ला केला. अमेरिका खोटे बोलते, फसविते, हे त्यांच्याशी कराराची चर्चा करता येत नाही. हे लोक रोज नवीन बोलतात. आधी ब्रिटिशांनी जगावर राज्य केले, तसे आता अमेरिका राज्य करण्याचे स्वप्न पाहत आहे. संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय घटनेत स्पष्ट लिहिले आहे की, दुसऱ्या राज्याच्या सीमेत प्रवेश करता येत नाही. भारत देश हा ब्रिक्सचा अध्यक्ष आहे.

ब्रीक्स इस्त्रायल व अमेरिकेला पाठिंबा देणार » पान २ वर

## व्हीएसआरचा मालक विमानात झोपला जय पवार यांच्याकडून व्हिडिओ शेअर

■ मुंबई

**व्हीएसआर** कंपनीच्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू होऊन आता एक महिना उलटला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचा धाकटा मुलगा जय पवार यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यात व्हीएसआर कंपनीचे मालक वैमानिक रोहित सिंह हे उड्डाणादरम्यान मुख्य वैमानिकाच्या शेजारील आसनावर झोपलेले दिसत



आहेत. या व्हिडिओची नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दखल घेतली आहे.

मोहोळ यांनी सांगितले की, जय पवार यांनी शेअर केलेला व्हिडिओ पाहिला असून, त्याची गंभीर दखल घेण्यात आली आहे. विमान सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाले असल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जय पवार पोस्टमध्ये म्हणाले की, एएआयबीचा प्राथमिक अहवाल मी वाचला. हा अहवाल » पान ६ वर

## खामेनींच्या हत्येवर मोदी गप्प का? सोनिया गांधींचा खरमरीत सवाल

■ नवी दिल्ली

**इराणचे** सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खामेनी युद्धात मारले गेले. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत एक शद्बही उच्चारला नाही. यावर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी कडाडून हल्ला चढवला आहे. खामेनींच्या हत्येवर मोदी गप्प का आहेत, असा सवाल सोनिया गांधी यांनी विचारला आहे.

सोनिया गांधी यांनी मोदींच्या परराष्ट्र धोरणावर सडकून टीका केली आहे. खामेनींच्या हत्येवर मोदी यांनी मौन बाळगणे म्हणजे तटस्थ राहणे नसून जबाबदारीपासून दूर पळण्यासारखे आहे, अशा शद्बांत सोनिया गांधी यांनी मोदींच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरूद्ध छेडलेले युद्ध आणि त्यामुळे बदललेली आंतरराष्ट्रीय परिस्थिती यावर सरकारने सविस्तर चर्चा घेतली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

## साबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश नाहीच सुप्रीम कोर्टाच्या विरोधात देवस्थानचा ठराव

■ कोची

**केरळ** विधानसभेच्या निवडणुकांच्या तोंडावर येथील प्रसिद्ध साबरीमला मंदिरात १० ते ५० वयाच्या महिलांनाही प्रवेश करू देण्यास परवानगी देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाच्या विरोधात त्रावणकोर देवस्वम बोर्डाने ठराव संमत केला आहे. या निर्णयाचे तीव्र पडसाद केरळच्या राजकीय वर्तुळात उमटण्याची शक्यता आहे.

केरळच्या पठनमथिट्टा जिल्ह्यातील पर्वतावर वसलेले भगवान अयप्पा यांचे हे साबरीमला मंदिर संपूर्ण देशात प्रसिध्द आहे. या मंदिरामध्ये



कित्येक वर्षांपासून १० ते ५० या वयोगटातील (मासिक पाळी येण्याच्या वयातील) महिलांना मंदिरात प्रवेश करण्यास मनाई आहे.

त्रावणकोर देवस्वम बोर्ड या मंदिराचे व्यवस्थापन पाहते. महिलांना प्रवेशबंदीच्या या प्रथेच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या याचिकेवर सप्टेंबर २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठासमोर सुनावणी झाली. भारतीय राज्यघटनेमध्ये जात-धर्म, स्त्री-पुरुष, उच्च-नीच अशा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला स्थान नाही. या आधारावर घटनापीठाने देवस्वम बोर्डाची ही प्रथा बंद करत साबरीमला » पान २ वर

## महाराष्ट्रासाठी यंदाचा उन्हाळा तापदायक ठरण्याची शक्यता

■ मुंबई

**यंदाचा** उन्हाळा राज्यात सरासरीपेक्षा अधिक तापदायक ठरेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबई, कोकण किनारपट्टी, पुणे, सातारा व विदर्भ भागात तापमान वाढणार असून, या आठवड्यात मुंबईतील कमाल तापमान सुमारे ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात मार्च ते मे या कालावधीत बहुतांश जिल्ह्यांत सरासरीपेक्षा जास्त तापमान राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातील आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही तुरळक भाग वगळता इतर ठिकाणी कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक राहील. कोकण किनारपट्टीवर तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मार्च महिन्यात मध्य महाराष्ट्रात काही भागांमध्ये तापमान तुलनेने कमी राहू शकते. देशाच्या बहुतांश भागांमध्ये मार्च ते मे या तीन महिन्यांत कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. मात्र मध्य भारतातील काही भाग आणि वायव्य भारतातील काही ठिकाणी कमाल तापमान सरासरीएवढे किंवा किंचित कमी राहू शकते.

## कृषी साहित्य खरेदी प्रकरण आमदार धनंजय मुंडे निर्दोष



■ बीड

**माजी** मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांना आणखी एका न्यायालयीन लढाईत दिलासा मिळाला आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेले कृषी साहित्य खरेदी, लाभाचे पदासह (ऑफिस ऑफ प्रॉफिट) विविध आरोप राज्य लोकायुक्तांनी फेटाळले आहेत.

कृषी साहित्य खरेदी प्रकरणासह ऑफिस ऑफ प्रॉफिटबाबत अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात तक्रार केली होती. या प्रकरणात मुंडे यांचे वकील शार्दुल सिंह यांनी बाजू मांडताना ऑफिस ऑफ प्रॉफिट संदर्भातील माहिती लोकायुक्तांकडे चुकीची व अपूर्ण

### लोकायुक्तांनी आरोप फेटाळले

सादर करण्यात आल्याचे नमूद केले. यासाठी त्यांनी खासदार जया बच्चन यांच्या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ दिला.

धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ आणि मूल्यसाखळी योजनेअंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवण्यात आला होता. या योजनेत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरीवर चालणारे स्प्रे पंप यांसारख्या साहित्याची खरेदी करण्यात आली. या खरेदी प्रक्रियेत अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा आरोपही अंजली दमानिया यांनी केला होता. या प्रकरणी आधीच मुंबई उच्च न्यायालय यांनी धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल देत संबंधित आरोप फेटाळले होते.

## बिहारमधून नितीन नबीन राज्यसभेत भाजपाच्या ९ उमेदवारांची यादी जाहीर

■ नवी दिल्ली

**राज्यसभा** निवडणुकीसाठी भाजपाने आपल्या नऊ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यात भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचा समावेश आहे. त्यांना बिहारमधून राज्यसभेवर पाठवण्यात येणार आहे. त्यांच्याबरोबर शिवेश कुमार यांनाही बिहारमधून राज्यसभेवर पाठवण्यात येणार आहे.

नितीन नबीन हे सध्या बिहार विधानसभेचे सदस्य असून, पटना येथील बांकीपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. ते बिहारमधील नितीश कुमार सरकारमध्ये मंत्री होते. मात्र पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. बिहारव्यतिरिक्त पश्चिम बंगालमधून पक्षाचे वरिष्ठ नेते राहुल सिन्हा यांना राज्यसभेत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या ते पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत पक्षाचा प्रमुख चेहरा आहेत. आसाममधून तेराश गोवाला आणि जोगेन मोहन, तर छत्तीसगडमधून लक्ष्मी वर्मा यांना राज्यसभेत पाठवण्याचा निर्णय झाला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## मरणाला भीत नाही! मनोज जरांगेंचे उत्तर

■ सोलापूर

**मराठा** आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी आपल्याला मिळणाऱ्या धमक्यांबाबत आज वक्तव्य केले. मी समाजासाठी लढतोय म्हणून रोज धमक्या येतात. मी मरणाला भीत नाही, असे त्यांनी स्पष्ट सांगितले. मात्र, समाजासाठी नवीन यंत्रणा राबवण्यासाठी वर्षभर आपण दौरे संपूर्णपणे थांबवणार आहोत, अशी घोषणा केली आहे.

करमाळा तालुक्यातील वरकुटे मूर्ती येथे शहीद जवान नवनाथ गात यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित



कार्यक्रमाला उपस्थित राहताना त्यांनी ही भूमिका मांडली. या कार्यक्रमात जरांगे-पाटील यांच्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टी करण्यात आली.

मनोज जरांगे-पाटील आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यात गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. धनंजय मुंडे यांच्या समर्थक आणि निकटवर्ती आणि परळी बाजार समितीचे माजी सभापती गोविंद फड यांनी फेसबुकवरून धमकी दिली आहे. याबाबत मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, मला माझे काम करू द्या. माझे संपूर्ण कुटुंब धोक्यात आहे. कधी कोणी येऊन हल्ला करेल, सांगता येत नाही. पण मी समाजासाठी उभा राहिलो आहे. रोज धमक्या येतात, पण मी त्यांना भीक घालत नाही. धमक्या देण्यापेक्षा समोर येऊन लढा. वर्षभर आता आपण संपूर्ण दौरे थांबवणार असून, समाजासाठी एक नवीन यंत्रणा उभी करण्याचे काम हाती घेतले आहे.

## महाराष्ट्रातील रंगोत्सवावर परप्रांतीयांचे अतिक्रमण

**मुंबई -** महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने साजरा केला जाणारा रंगपंचमीचा सण हळूहळू नामशेष होत असल्याची खंत व्यक्त करत मराठी एकीकरण समितीने शासनावर गंभीर आरोप केले. उत्तरेकडील राज्यांच्या पद्धतीनुसार धुळवडीच्या दिवशीच रंगोत्सव साजरा करण्याची प्रथा वाढल्यामुळे मराठी माणसाच्या पारंपरिक रंगपंचमी उत्सवावर परप्रांतीय संस्कृतीचे अतिक्रमण होत असल्याचा दावा समितीने केला. समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन रंगपंचमीच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी सुमारे १२ कोटी मराठी जनतेच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे नमूद केले.

## खामेनींच्या मृत्यूनंतर काश्मीरमध्ये हिंदू-मुस्लिमांकडून संयुक्त बंद

### व्यापारी व समाजप्रतिनिधींचा पाठिंबा

■ पुंछ

**इराणचे** सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येनंतर आज काश्मीरमधील पीर पंजाल प्रदेशातील मेंढर शहरासह आसपासच्या भागात कडक बंद पाळण्यात आला. मेंढर व्यापारी मंडळाने हिंदू आणि मुस्लीम समाजाने संयुक्तपणे या बंदची हाक दिली होती. हिंदू आणि मुस्लीम दोन्ही धर्मांच्या नेत्यांसह, बिओपर मंडळ मेंढर यांचाही त्यात सहभाग होता.

मेंढर शहरातील सर्व दुकाने, व्यावसायिक आस्थापने आणि व्यावसायिक केंद्रे आज दिवसभर बंद होती. रस्त्यांवरील वाहतूक मोठ्या



प्रमाणात ठप्प होती, फक्त अत्यावश्यक सेवा मर्यादित प्रमाणात सुरू होत्या. मुख्य बाजारपेठा आणि आसपासच्या परिसरात पूर्णपणे बंद पाळण्यात आला. व्यापारी आणि समाजप्रतिनिधींनी या आंदोलनाला पाठिंबा देत सांगितले की, इराणी नेत्याच्या हत्येबद्दल एकत्र पाठिंबा दर्शवण्यासाठी हा बंद आयोजित करण्यात आला होता. मेंढर व्यापारी मंडळाचे प्रतिनिधी आणि विविध धर्मांतील ज्येष्ठांच्या बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. जम्मू-काश्मीरमध्ये रविवारपासून आंदोलन होत असून, काल ते अधिक तीव्र झाले. श्रीनगरमधील लाल चौक येथे निदर्शकांची मोठी गर्दी जमली होती. तसेच बडगाम, बांदीपोरा, बारामुल्ला, अनंतनाग आणि पुलवामा जिल्ह्यांतही निदर्शने झाली.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इमिटेशन पॅकिंग कामासाठी मुली पाहिजेत, पगार- १३,०००/- वयोमर्यादा ३० वर्षे, कामाची वेळ ९ ते ६.३०. भद्रेशभाऊ, ११, स्वस्तिक इंडस्ट्रीज, कामगार स्टेडियमसमोर सेनापती बापट मार्ग, दादर (वेस्ट) फोन - **9819353631 / 8356983848** {NC254252}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत, पगार- 27,500/- (12 तास) **8291917060 / 9819191361** {NC254354}

पाहिजे हॉस्पिटलसाठी लेडीज गोरेगाव मावशी / हाऊसकिपिंग जेन्ट्स सिक्युरिटी गार्ड-राममंदिर, अंधेरी, तुर्भे- **8097507698** {NC254351}

सिक्युरिटी गार्ड, हाउसकिपिंग, सुपरवायझर, ड्रायव्हर पाहिजे.१४,०००/- - २५,०००/-, राहण्याची सोय गणेश- **9834753672** {NC254308}

अनुभवी PVC welder चेंबूरस्थित फॅक्टरीला त्वरित पाहिजे Tarpaulin welding येणे आवश्यक संपर्कः **7977316601** {NC254356}

ठाणे, कोलशेत परिसरात किमान ५ वर्षे अनुभवी ड्रायव्हर आवश्यक आहे. लवकरात लवकर. संपर्क:- **9322259537** {NC254379}

कोकणात कुडाळयेथे फार्महाऊस मधील बंगले साफसफाईसाठी, इतर कामासाठी महिला व पुरुष कामगार पाहिजे. वय ५० च्या आत. राहण्याची मोफत सोय. **9867354944 / 9820382343** {NC254394}

## पाहिजेत

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला ऑफिस कामासाठी मुली फवारणी करणारी माणसे आणि ड्रायव्हर पाहिजेत. पगार 12,000/- + गाडीभाडे + कमिशन **8356824867** {NC254304}

**ठाण्यातील लेडीज शोरूमसाठी**
**सेल्स गर्ल्स पाहिजेत**
**ठाणे येथील एस. ए. इनामदार, या नामवंत रेडीमेड ब्लाऊज-च्या शोरूमसाठी अनुभवी सेल्सगर्ल पाहिजेत.**
**(१०वी/१२वीपास)**
**अर्जासह प्रत्यक्ष भेटा.**
**पत्ता : चिंतामणी ज्वेलर्स शेजारी, जांभळी नाका, ठाणे. (प).**
**9930198166**

10/24 तास होम पेशंटड्युटी साठी वॉर्डबॉय पाहिजे. चांगला perday. **8451091740 / 9867539635** {NC254310}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+जेवण+निवास मोफत) घरकुल केअर सेंटर : **9819426634 / 9969529162** {NC254380}

ठाणे मुंबईमध्ये बेबीकेअरसाठी १०/२४ तास बाई मुलगी पाहिजे. **7977530720 / 8850329548** {NC254309}

ठाण्यात एकाकी राहणाऱ्या वयस्कर व्यक्तिस घरातील व बाहेरील काम करण्यासाठी सुशिक्षित मुलगी पाहिजे. तीन हात नाका ते रामचंद्र नगर परिसरात राहणाऱ्यांनी संपर्क साधावा- **9820810715 / 9967201425** {NC254312}

## पाहिजेत

कल्याणमध्ये दवाखान्यात हेल्दी निर्व्यसनी अनुभवी तरुण मुले, वॉर्डबॉय, मसाजिस्ट 24 तासांसाठी. पगार 10,000-15,000, जेवणाची सोय. **8097915773** {NC254363}

स्त्री, पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजेत. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा **7040206848** {NC254222}

दादर प्रभादेवी येथे फक्त लॉजिंग हाऊसमध्ये हाऊसकिपिंग, रुम बॉय करिता कामगार पाहिजे. वय कमाल मर्यादा-४५ वर्ष, शिक्षणाची अट नाही. पुढील नंबर वर बायोडेटा पाठवावा- **9820846727** {NC254391}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणे+ खाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC254294}

अनुभवी सिक्योरिटी गार्ड (पुरुष/महिला) आणि सुपरवायजर आवश्यक आहेत. वय ४० वर्षांपेक्षा कमी असावे. २६ दिवसांची ड्युटी, पगार 22,000/-+ PF+ESIC ठिकाणः चकाला, अंधेरी (पूर्व). संपर्कः **9594871694/ 9821406617** {NC254341}

फीडरमन / बॉयलर ऑपरेटर-५ रंगांच्या मशीनसाठी (Heidelberg SM-74) पंचिंग / फोल्डिंग मशीन ऑपरेटर, बाइंडिंग वर्क हेल्पर, स्थळः लोअर परळ (पश्चिम), शाह अँड नाहर इंडस्ट्रियल इस्टेट. संपर्क कराः **9820811946 (40696800 / 802)** {NC254381}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, पाहिजे संपर्कः **9820930362 / 9930589715** {NC254210}

इमिटेशन कामासाठी अनुभवी / बिनअनुभवी मुली पाहिजे. मालाड (वेस्ट) **7021978608 / 9920064554** {NC254353}

फायर सिस्टीम मेंटेनन्स कामासाठी टेक्निशियन, पम्प ऑपरेटर, इलेक्ट्रिक पॅनेल इलेक्ट्रीशियन पाहिजे. संपर्कः **9870209266 / 9619691229** {NC254352}

## पाहिजेत

P Square Pest Control मध्ये मुले/ मुली पाहिजेत. दादर **9820548338** {NC254316}

अंधेरीस्थित कुरीअर तसेच कार्गो कंपनीकरिता बिलिंगसाठी कॉम्प्युटरची माहिती असलेले मुले/मुली पाहिजेत. कमीतकमी 2 वर्षाचा कुरीअर/कार्गोमधील अनुभव आवश्यक. अंधेरीमधील राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क करा- मॅक्स कुरीयर अँण्ड कार्गो, गाळा नं-28, मखारीया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई- 400093 फोन- **9320101188** {NC254321}

अंधेरी येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी OT, ICU आणि हाऊसकिपिंगकरिता स्टाफ पगार- 8 तास 17,000/- व 12 तास 21,000/- संपर्कः **8369185580 / 9920530142** {NC254275}

**पाहिजेत**
नवी मुंबई, रबाळे MIDC येथील निर्यात उत्पादन कंपनीला खालील अनुभवी उमेदवारांची आवश्यकता आहे.
- संगणक ऑपरेटर (संगणक जाणकार आणि ३-५ वर्षांचा अनुभव)
- जनरल लिपिक (संगणक जाणकार आणि ३-५ वर्षांचा अनुभव)

परमनंट जॉब, बोनस, पी.एफ., इन्शुरन्स, घरभाडे व मोफत बस सेवा.
उमेदवारांनी त्यांचा संपूर्ण बायोडेटा आणि अपेक्षित पगार exportnewmumbai@gmail.com या ई-मेल पत्त्यावर शेअर करावा.

विरार येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी वॉर्डबॉय आणि आयाबाई पाहिजेत. 8 तास ड्युटी पगार - 14,000/- व 12 तास ड्युटी पगार- 20,000/- संपर्क:- **8976625700** {NC254273}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी / टीचर / गृहिणी पाहिजेत. (पगार+पीएफ). **9670731420** {NC254359}

मालाड (ईस्ट) मध्ये हेल्पर कम डिलीवरी बॉईज पाहिजे. **9892106609** {NC254385}

मॅजेस्टिक ऑफिससाठी मुले पाहिजेत हीना आर्केड, जोगेश्वरी पश्चिमः **9967722995** {NC254383}

## पाहिजेत

ॲल्युमिनियम विंडो कॅनोपी, कायडींग, रुफिंग, फॅब्रिकेटरचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर कारागिर व हेल्पर अर्जंट पाहिजेत. उत्तम वेतन. संपर्क **9324804795** {NC254384}

पाहिजेः हैदराबाद-प्रिंटिंग आणि पॅकेजिंग कंपनी, फ्लेक्सो प्रिंटिंग मशिन ऑपरेटर-अनुभवः 10 ते 20 वर्षे (NILPETER 10c/6c/ OMET 8c/Lombardi) आणि Flexo-AVT ऑपरेटर-अनुभवः 5 ते 10 वर्षे (ग्राफ्ट्रोनिक) संपर्कः- **9618614560** {NC254305}

मॉलमध्ये / पॅकिंगमध्ये मुले / मुली अर्जन्ट पाहिजेत. पगार- 15000/- - 20,000/- **9702621740** {NC254382}

पाहिजेः हैदराबाद-प्रिंटिंग आणि पॅकेजिंग कंपनी, ऑफसेट प्रिंटिंग ऑपरेटर-अनुभवः 10 ते 20 वर्षे (KOMORI 6C / MIB 6C / MIB 5c) पंचिंग मशीन ऑपरेटर-अनुभवः 5 ते 10 वर्षे (BOBST) संपर्कः- **9618614560** {NC254306}

मिठाईच्या दुकानात हाऊसकिपिंगसाठी/ काउंटर बॉय तरुण अनुभवी मुलगा पाहिजे, 9 तास 13,200/- बोरिवली, 12 तास- घाटकोपर 18,400/- काऊंटर बॉय 12 तास 21,600/- घाटकोपर- **9699927271** {NC254319}

बोरिवलीमध्ये मुंबई रिअल्टी प्रोफेशनल इस्टेट एजंटकडे Male-Female नोकरीची जागा उपलब्ध आहे. Male स्वतःची टु-व्हिलर असणे आवश्यक, Female कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क **7485920033** {NC254404}

लोअर परेल चिंचपोकळी येथे ई-बाईक वज्रा डिलेव्हरीसाठी तरुण पाहिजेत. पगार 14,000+ रविवार सुट्टी, 9 ते 7संपर्क : **9320064643** किंवा व्हॉट्सअप नंबर **8080084843** वर HI पाठवा. {NC254402}

झेरॉक्ससाठी ऑपरेटर पाहिजे. अंधेरी पूर्व. संपर्क **9892646651** {NC254401}

अंधेरी वेस्टमध्ये लेधर बेल्ट कंपनीसाठी लेबर वर्कर पाहिजे. संपर्क : **9820871004** {NC254400}

## पाहिजेत

अंधेरी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 10700 फोन- **7977596442** {NC254398}

मुलुंड वेस्ट येथे २४ तासासाठी घरगुती देखभाल करणारी बाई पाहिजे. संपर्क : **9820224945** {NC254405}

फिमेल क्लर्क वय 45 ते आत, रूटीन कामासाठी मुलुंड वेस्ट येथे पाहिजेत. कॉम्प्युटर नॉलेज प्राधान्य (वेळ 10 ते 4) पगार 8000+ संपर्क **9821460567** {NC254399}

ऑफिस बॉय हवा (वय ४५ पर्यंत), चर्चगेट/लोअर परळ. दहावी उत्तीर्ण, सोपी इंग्रजी आवश्यक. गोडाऊन व ऑफिसशी संबंधित कामे. पगार रु.१६,०००/-+ वेळ ९-७. इंटरव्ह्यू वेळ १० ते ४ (सोम-शुक्र). ठिकाण : दि. इंटरनॅशनल बिल्डींग, साऊथ विंग, २रा मजला, SBI वर चर्चगेट स्थानकासमोर. संपर्क **9324522478 / 8108888537** {NC254406}

शाळेच्या बससाठी वैध लायसन्स, बॅच असलेले ड्रायव्हर्स पाहिजेत. ड्युटी सकाळी 6.30 ते संध्याकाळी 5.00 सुरुवातीचा पगार 22,000/ आणि काम मलबार हिल आणि चर्चगेट फाऊंटन एरिया येथे बस पार्किंग लोढा पार्किंग परेल येथे संपर्क. सकाळी 9.00 ते संध्याकाळी 6.00 **9930176861 / 9324870882** {NC254407}

ऑफिसच्या व पॅकिंगच्या कामासाठी दोन मुली/बाई पाहिजेत. इच्छुकांनी स्वतः येऊन भेटावे. कोरइन्स्पायर १०, जगमोहन मेन्शन २०, अवंतिकाबाई गोखले स्ट्रीटह, ओपेरा हाऊस मुंबई-४००००४ {NC254409}

इमिटेशन ज्वेलरी शोरूमसाठी सेल्सगर्ल आणि पॅकींगसाठी मुलगी पाहिजे. झवेरी बाजार- **9820392333** {NC254333}

## Situation Vacant

Reqd Tally operator with accounting knowledge at our Malad West Office. Call : **9820080461** {NC254403}

SOLDERING / ELECTRONICS TECHNICIAN JOGESHWARI EAST. MALE/ FEMALE ALFA ECO TECHNOLOGIES LLP. **8356023573** www.alfatechno.net {NC254343}

## Situation Vacant

Wanted courier Boys at Khar. Apply with bio data Call : **9930011100** {NC254396}

**REQUIRED PEON / OFFICE BOY AT PRABHADEVI MINIMUM 10TH STANDARD, MUST BE ABLE TO SPEAK ENGLISH AND MARATHI. 9167308260 / 022-35728341** {NC254386}

## गुंतवणूक विषयक

फक्त ६ महिन्यात कर्ज कमी करणारे जीवनविमा गुंतवणूक साक्षरता अभियान- **9373956687/ 9326367944** {NC254009}

## व्यवसायविषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा, 3,000/- कमविण्याची. अनिरुद्धा ग्रुप दादर- **8652643434 / 9076403434** {NC25324}

## प्रॉपर्टीविषयक

**भव्य घरकुल योजना, मंगलमूर्ती अपार्टमेंट G+5 एरिया 550-25,00,000/-, बुकींग- 1,00,000/- 80% कर्ज. नालासोपारा पश्चिम. 9870316444** {NC254388}

## वर पाहिजे

सुंदर वधु 29, 12 वी, 5.3 शिवणकाम करते आणि शिवण क्लास घेते. आई वडील नाही काका काकूंकडे राहते. निर्व्यसनी कष्टाळू मुलगा जातीची अट नाही. (त्वरीत विवाह.) (जात मराठा). **8446389460** {NC254408}

### -: वाचकांना सूचना :-

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - मॅनेजर, 'नवाकाळ'

# आजचे राशी भविष्य

बुधवार ता. ४ मार्च २०२६

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | आज अवघड कामेही सहजगत्या पार पडतील. महत्त्वाचे निर्णय घेण्यास दिवस अनुकूल आहे. प्रियजनांबरोबर सहलीचा आनंद लाभेल. |
| वृषभ | महत्त्वाचे निर्णय घेण्यास अनुकूलता नाही. जवळच्या मित्रांकडूनही विश्वासघात संभवतो. अहंपणा टाळा. निष्काळजीपणाने आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. |
| मिथुन | आर्थिक चिंता त्रस्त करतील. कामाचा ताण वाढेल. जोडीदाराशी बोलताना कठोरपणा आणि आक्रमकता टाळा. |
| कर्क | तुमच्या बोलण्याने कामे मार्गी लागतील. आध्यात्मिक गोष्टींमधून समाधान लाभेल. तुम्ही केलेल्या मेहनतीमुळे वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. |
| सिंह | आज कठीण आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाका. कामाचा अत्याधिक ताण असेल. |
| कन्या | मनावर चिंतेचे सावट राहील. दैनंदिन कामेही हातावेगळी करणे अवघड होऊन बसेल. खिलाडूपणाने वागणे उपयोगी राहील. |
| तूळ | सर्व आघाड्यांवर आज संयमाने वागावे लागेल. कोणतेही पाऊल उचलण्याआधी नीट विचार करा. खर्चिकपणाला आळा घाला. |
| वृश्चिक | प्रगतीच्या दिशेने वाटचाल होईल. इतरांशी सलोख्याचे संबंध राखणे हिताचे ठरेल. कष्टाचे चीज होईल. |
| धनु | आजचा दिवस संथावलेला राहील. वायफळ खर्च होण्याची शक्यता आहे. कामात चुका टाळा. |
| मकर | धैर्य आणि संयमाचा अभाव जाणवेल. नोकरीव्यवसायात कामाचे प्रमाण वाढेल. सहकाऱ्यांची साथ लाभणे अवघड राहील. संयमपूर्वक वागा. |
| कुंभ | फारसे चढउतार वाट्याला येणार नसले तरी संयमपूर्वक वागणे हिताचे ठरेल. आर्थिक चणचण जाणवेल. ध्यानधारणा उपयोगी ठरेल. |
| मीन | हाती घेतलेल्या कामात अपेक्षित यश मिळेल. लवचिक धोरण ठेवा. सहकारी आणि मित्रांशी सलोखा वाढेल. |

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 02/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : MG-02 : 1805

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 9481 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 8233 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0881 | 1553 | 2523 | 3260 | 3362 | 3905 | 6349 | 7517 | 8127 | 8983 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2259 | 3305 | 3760 | 3847 | 4180 | 4365 | 5397 | 5614 | 7045 | 9637 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0574 | 2940 | 3092 | 6411 | 6428 | 6555 | 6836 | 8214 | 9806 | 9947 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1673 | 2683 | 3837 | 4612 | 5438 | 6168 | 7347 | 8435 | 9111 |
| | | 1738 | 2721 | 3867 | 4644 | 5458 | 6256 | 7378 | 8536 | 9266 |
| | | 1755 | 2733 | 3885 | 4726 | 5460 | 6380 | 7457 | 8543 | 9299 |
| 0009 | 0671 | 1810 | 2760 | 4045 | 4734 | 5468 | 6433 | 7517 | 8556 | 9319 |
| 0038 | 0760 | 1837 | 2902 | 4114 | 4738 | 5477 | 6497 | 7524 | 8583 | 9366 |
| 0050 | 0818 | 2005 | 2934 | 4227 | 4856 | 5519 | 6637 | 7574 | 8584 | 9369 |
| 0057 | 0890 | 2045 | 2944 | 4244 | 4870 | 5554 | 6639 | 7578 | 8631 | 9371 |
| 0104 | 0898 | 2075 | 3015 | 4260 | 4924 | 5555 | 6656 | 7655 | 8633 | 9384 |
| 0106 | 1041 | 2100 | 3038 | 4319 | 5008 | 5615 | 6665 | 7693 | 8638 | 9448 |
| 0145 | 1078 | 2171 | 3080 | 4344 | 5087 | 5645 | 6682 | 7707 | 8658 | 9457 |
| 0160 | 1108 | 2210 | 3240 | 4346 | 5108 | 5743 | 6688 | 7732 | 8687 | 9552 |
| 0219 | 1139 | 2233 | 3419 | 4382 | 5133 | 5926 | 6762 | 7769 | 8778 | 9603 |
| 0260 | 1194 | 2261 | 3433 | 4396 | 5252 | 5935 | 6768 | 7873 | 8809 | 9692 |
| 0269 | 1196 | 2374 | 3512 | 4417 | 5285 | 5957 | 6866 | 7941 | 8842 | 9812 |
| 0341 | 1257 | 2513 | 3637 | 4431 | 5295 | 5986 | 6936 | 8082 | 8878 | 9887 |
| 0364 | 1310 | 2525 | 3641 | 4434 | 5305 | 6041 | 6991 | 8108 | 8898 | 9895 |
| 0488 | 1561 | 2532 | 3664 | 4436 | 5325 | 6083 | 7015 | 8129 | 8912 | 9913 |
| 0526 | 1588 | 2546 | 3710 | 4442 | 5361 | 6101 | 7062 | 8192 | 8925 | 9916 |
| 0569 | 1612 | 2583 | 3769 | 4448 | 5402 | 6116 | 7157 | 8347 | 9039 | 9963 |
| 0577 | 1628 | 2642 | 3773 | 4460 | 5435 | 6126 | 7180 | 8350 | 9066 | 9980 |
| 0645 | 1671 | 2681 | 3816 | 4470 | 5437 | 6130 | 7187 | 8399 | 9094 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 02/03/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : GL-00 : 9014

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0404 | 2450 | 3489 | 3701 | 4217 | 5740 किशोर लॉटरी सेंटर, सांगली | 8684 | 9270 | 9429 | 9875 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1306 | 1650 | 6381 | 8266 | 8277 | 8341 | 9251 | 9527 | 9856 | 9921 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2313 | 3420 | 5452 | 6511 | 7576 | 7909 | 7934 | 7988 | 8348 | 9377 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0971 | 1198 | 2133 | 4206 | 5072 | 6203 | 6929 | 6944 | 8243 | 9668 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1800 | 2941 | 3738 | 4670 | 5543 | 6186 | 6798 | 7687 | 8715 | 9349 |
| | | 1821 | 2982 | 3773 | 4692 | 5545 | 6216 | 6849 | 7713 | 8782 | 9356 |
| 0018 | 0889 | 1835 | 3010 | 3923 | 4699 | 5553 | 6249 | 6902 | 7739 | 8800 | 9383 |
| 0041 | 0911 | 1918 | 3020 | 3959 | 4704 | 5555 | 6267 | 6936 | 7745 | 8804 | 9423 |
| 0058 | 0997 | 1982 | 3039 | 4030 | 4774 | 5565 | 6318 | 6952 | 7786 | 8815 | 9431 |
| 0080 | 1110 | 2084 | 3138 | 4034 | 4851 | 5573 | 6327 | 6986 | 7791 | 8856 | 9450 |
| 0094 | 1150 | 2215 | 3145 | 4112 | 4866 | 5588 | 6361 | 7006 | 7914 | 8858 | 9472 |
| 0201 | 1154 | 2237 | 3157 | 4133 | 4934 | 5592 | 6388 | 7116 | 7934 | 8880 | 9479 |
| 0226 | 1166 | 2252 | 3183 | 4167 | 4980 | 5654 | 6400 | 7178 | 7972 | 8898 | 9484 |
| 0318 | 1173 | 2254 | 3184 | 4194 | 4994 | 5717 | 6414 | 7179 | 8013 | 8930 | 9640 |
| 0397 | 1184 | 2262 | 3213 | 4247 | 5059 | 5758 | 6416 | 7243 | 8023 | 8932 | 9734 |
| 0420 | 1192 | 2264 | 3234 | 4336 | 5095 | 5797 | 6422 | 7287 | 8038 | 8981 | 9778 |
| 0437 | 1226 | 2266 | 3235 | 4384 | 5186 | 5859 | 6423 | 7314 | 8125 | 8989 | 9828 |
| 0481 | 1262 | 2285 | 3237 | 4407 | 5200 | 5952 | 6425 | 7327 | 8169 | 9007 | 9838 |
| 0527 | 1311 | 2302 | 3293 | 4411 | 5216 | 5953 | 6454 | 7402 | 8188 | 9013 | 9869 |
| 0575 | 1316 | 2353 | 3375 | 4417 | 5292 | 5954 | 6470 | 7437 | 8243 | 9182 | 9876 |
| 0576 | 1357 | 2375 | 3397 | 4437 | 5371 | 6005 | 6515 | 7454 | 8299 | 9247 | 9892 |
| 0590 | 1503 | 2394 | 3527 | 4442 | 5395 | 6008 | 6569 | 7474 | 8365 | 9292 | 9909 |
| 0609 | 1585 | 2690 | 3535 | 4459 | 5459 | 6048 | 6660 | 7491 | 8480 | 9295 | 9953 |
| 0618 | 1641 | 2749 | 3584 | 4496 | 5510 | 6049 | 6767 | 7550 | 8548 | 9299 | 9962 |
| 0619 | 1712 | 2792 | 3595 | 4584 | 5527 | 6099 | 6772 | 7630 | 8584 | 9328 | 9976 |
| 0807 | 1717 | 2929 | 3634 | 4640 | 5541 | 6161 | 6786 | 7677 | 8618 | 9344 | 9989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ४/३/२०२६

| | | |
|---|---|---|
| ६ | ४ | ९ |
| ६३ | ४३ | ९३ |
| ६८ | ४८ | ९८ |
| १६९ | १४९ | १८० |
| २४० | ३३८ | ४५९ |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 09 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 02/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : SL-01 : 1330

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1275 | 1350 | 1345 | 1634 | 5219 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई | 6942 | 8011 | 8037 | 8847 | 9015 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1378 | 2147 | 2241 | 2453 | 3131 | 3645 | 7203 | 8319 | 9558 | 9911 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0044 | 0051 | 0581 | 1102 | 3243 | 6971 | 7823 | 8086 | 8510 | 9956 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0840 | 2006 | 3793 | 4808 | 5821 | 7794 | 8552 | 9447 |
| | 0915 | 2015 | 3906 | 4846 | 5857 | 8004 | 8586 | 9448 |
| 0004 | 1119 | 2128 | 3980 | 5174 | 5923 | 8182 | 8689 | 9518 |
| 0076 | 1132 | 2228 | 4047 | 5215 | 5982 | 8187 | 8716 | 9610 |
| 0077 | 1137 | 2233 | 4070 | 5281 | 6298 | 8227 | 8840 | 9615 |
| 0188 | 1152 | 2482 | 4143 | 5369 | 6325 | 8311 | 8895 | 9623 |
| 0307 | 1161 | 2622 | 4303 | 5513 | 6361 | 8313 | 9049 | 9719 |
| 0443 | 1167 | 2661 | 4415 | 5541 | 6638 | 8319 | 9121 | 9746 |
| 0478 | 1391 | 2796 | 4438 | 5549 | 6869 | 8385 | 9169 | 9749 |
| 0524 | 1415 | 3117 | 4484 | 5551 | 6921 | 8389 | 9193 | 9879 |
| 0529 | 1809 | 3341 | 4524 | 5558 | 7069 | 8418 | 9199 | 9903 |
| 0598 | 1816 | 3556 | 4605 | 5723 | 7473 | 8453 | 9337 | 9918 |
| 0829 | 1851 | 3638 | 4727 | 5754 | 7724 | 8515 | 9413 | 9928 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर सोमवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 09 — सोडत दिनांक 02/03/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : SL-04 : 2613

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- : पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2613 — जे. पी. एस. लॉटरी सेंटर - डहाणू, लकी लॉटरी - अहमदनगर

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 2994 — श्री अष्टविनायक लॉटरी - औरंगाबाद

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1026 | 3363 | 3813 | 4806 | 4902 | 5711 | 6471 | 8134 | 8549 | 8690 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0594 | 1082 | 2595 | 3056 | 4666 | 5567 | 6238 | 6933 | 8030 | 9150 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0887 | 1299 | 1834 | 2090 | 2490 | 3530 | 5946 | 6779 | 9359 | 9374 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0220 | 1594 | 1742 | 1775 | 2918 | 3430 | 4351 | 6661 | 6729 | 9567 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1171 | 1774 | 2299 | 2958 | 3752 | 4749 | 5518 | 6092 | 6768 | 7706 | 8587 | 9250 |
| | | 1187 | 1791 | 2315 | 2962 | 3780 | 4769 | 5531 | 6096 | 6796 | 7710 | 8617 | 9262 |
| | | 1189 | 1797 | 2324 | 2979 | 3830 | 4822 | 5538 | 6105 | 6798 | 7723 | 8683 | 9290 |
| | | 1191 | 1805 | 2343 | 2995 | 3837 | 4860 | 5540 | 6131 | 6821 | 7740 | 8708 | 9294 |
| | | 1196 | 1813 | 2359 | 3052 | 3874 | 4887 | 5554 | 6198 | 6839 | 7744 | 8759 | 9295 |
| 0001 | 0661 | 1201 | 1822 | 2363 | 3093 | 3947 | 4909 | 5555 | 6230 | 6866 | 7757 | 8760 | 9299 |
| 0026 | 0664 | 1216 | 1840 | 2459 | 3139 | 3961 | 4915 | 5557 | 6362 | 6916 | 7790 | 8777 | 9332 |
| 0055 | 0685 | 1225 | 1841 | 2470 | 3144 | 4050 | 4940 | 5561 | 6369 | 6931 | 7791 | 8783 | 9362 |
| 0060 | 0697 | 1238 | 1871 | 2473 | 3203 | 4057 | 4945 | 5573 | 6423 | 6957 | 7800 | 8797 | 9378 |
| 0071 | 0729 | 1253 | 1896 | 2487 | 3231 | 4059 | 4966 | 5584 | 6461 | 6963 | 7836 | 8806 | 9401 |
| 0081 | 0754 | 1268 | 1918 | 2501 | 3236 | 4135 | 4982 | 5608 | 6466 | 6964 | 7839 | 8807 | 9408 |
| 0082 | 0762 | 1286 | 1937 | 2503 | 3255 | 4143 | 5009 | 5644 | 6474 | 6986 | 7852 | 8817 | 9463 |
| 0118 | 0766 | 1289 | 1949 | 2513 | 3272 | 4191 | 5025 | 5651 | 6476 | 7007 | 7876 | 8828 | 9539 |
| 0160 | 0774 | 1311 | 1957 | 2521 | 3310 | 4210 | 5028 | 5653 | 6485 | 7022 | 7916 | 8836 | 9543 |
| 0164 | 0820 | 1312 | 1967 | 2530 | 3317 | 4234 | 5053 | 5657 | 6486 | 7096 | 7970 | 8838 | 9554 |
| 0171 | 0823 | 1313 | 1971 | 2582 | 3337 | 4240 | 5054 | 5678 | 6487 | 7106 | 8022 | 8842 | 9598 |
| 0199 | 0838 | 1314 | 1984 | 2585 | 3339 | 4246 | 5062 | 5701 | 6531 | 7116 | 8077 | 8849 | 9634 |
| 0201 | 0849 | 1331 | 1990 | 2591 | 3371 | 4248 | 5108 | 5709 | 6535 | 7117 | 8088 | 8853 | 9639 |
| 0210 | 0859 | 1398 | 2102 | 2602 | 3373 | 4272 | 5116 | 5731 | 6555 | 7144 | 8109 | 8858 | 9641 |
| 0290 | 0874 | 1415 | 2125 | 2626 | 3375 | 4285 | 5132 | 5752 | 6561 | 7169 | 8112 | 8866 | 9654 |
| 0310 | 0901 | 1446 | 2131 | 2640 | 3395 | 4349 | 5136 | 5758 | 6562 | 7197 | 8113 | 8883 | 9687 |
| 0315 | 0910 | 1451 | 2146 | 2662 | 3397 | 4363 | 5158 | 5765 | 6579 | 7200 | 8171 | 8891 | 9719 |
| 0320 | 0938 | 1510 | 2147 | 2678 | 3417 | 4403 | 5182 | 5780 | 6580 | 7259 | 8178 | 8895 | 9739 |
| 0338 | 0960 | 1526 | 2164 | 2702 | 3432 | 4409 | 5187 | 5804 | 6598 | 7295 | 8216 | 8897 | 9743 |
| 0378 | 0962 | 1527 | 2167 | 2721 | 3433 | 4415 | 5195 | 5824 | 6612 | 7348 | 8218 | 8932 | 9757 |
| 0399 | 1010 | 1534 | 2218 | 2724 | 3476 | 4434 | 5203 | 5841 | 6616 | 7376 | 8246 | 8933 | 9759 |
| 0407 | 1101 | 1542 | 2219 | 2735 | 3501 | 4463 | 5226 | 5854 | 6627 | 7390 | 8258 | 8934 | 9808 |
| 0430 | 1103 | 1571 | 2222 | 2742 | 3503 | 4484 | 5249 | 5857 | 6646 | 7400 | 8266 | 8938 | 9833 |
| 0436 | 1110 | 1582 | 2224 | 2750 | 3559 | 4514 | 5251 | 5865 | 6647 | 7457 | 8268 | 8993 | 9908 |
| 0506 | 1111 | 1595 | 2227 | 2752 | 3561 | 4525 | 5254 | 5917 | 6656 | 7464 | 8284 | 9019 | 9909 |
| 0526 | 1116 | 1597 | 2229 | 2773 | 3585 | 4609 | 5258 | 5924 | 6658 | 7470 | 8288 | 9066 | 9910 |
| 0530 | 1119 | 1604 | 2230 | 2782 | 3592 | 4662 | 5292 | 5952 | 6664 | 7489 | 8308 | 9107 | 9913 |
| 0532 | 1124 | 1610 | 2231 | 2823 | 3593 | 4664 | 5318 | 5955 | 6674 | 7547 | 8336 | 9120 | 9939 |
| 0542 | 1132 | 1618 | 2246 | 2832 | 3634 | 4680 | 5385 | 5987 | 6681 | 7551 | 8348 | 9141 | 9951 |
| 0570 | 1136 | 1660 | 2271 | 2878 | 3637 | 4682 | 5407 | 6057 | 6682 | 7552 | 8393 | 9161 | 9967 |
| 0590 | 1146 | 1680 | 2272 | 2882 | 3677 | 4689 | 5421 | 6058 | 6694 | 7652 | 8413 | 9166 | 9974 |
| 0600 | 1147 | 1689 | 2275 | 2904 | 3680 | 4694 | 5454 | 6062 | 6696 | 7671 | 8460 | 9176 | 9985 |
| 0603 | 1151 | 1717 | 2284 | 2928 | 3683 | 4724 | 5504 | 6063 | 6705 | 7676 | 8462 | 9187 | 9990 |
| 0633 | 1159 | 1747 | 2287 | 2929 | 3695 | 4745 | 5505 | 6080 | 6711 | 7701 | 8572 | 9217 | 9994 |
| 0650 | 1160 | 1749 | 2288 | 2935 | 3723 | 4748 | 5515 | 6086 | 6760 | 7705 | 8581 | 9232 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# राऊळगाव स्फोटानंतर कारवाई कंपनीच्या २१ अधिकाऱ्यांवर गुन्हा

## मृतांचा आकडा १९ वर

नागपूर

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथे असलेल्या एसबीएल एनर्जी लिमिटेड या कंपनीत झालेल्या स्फोट प्रकरणी कंपनीच्या २१ वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आतापर्यंत ९ जणांना अटक करण्यात आली आहे.

१ मार्च २०२६ रोजी सकाळी कंपनीत मोठा स्फोट झाला. दारुगोळा तसेच डेटोनेटरसह इतर स्फोटके तयार करणाऱ्या या कंपनीत झालेल्या स्फोटात अनेक कामगार जखमी झाले होते. त्यापैकी एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. स्फोटातील मृतांचा आकडा १९ वर पोहोचला आहे.या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

# साबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश नाहीच

पान १ वरून

मंदिरात सर्व वयाच्या महिलांना प्रवेश करण्यास परवानगी दिली. घटनापीठात ४ विरुद्ध १ अशा बहुमताने साबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याचा निर्णय करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे त्यावेळी तीव्र पडसाद संपूर्ण राज्यात उमटले होते. १० ते ५० वयाच्या महिलांना मंदिरात प्रवेश न देणे हा धार्मिक श्रद्धेचा भाग असून, त्यात न्यायालयांनी ढवळाढवळ करू नये, असा कट्टर हिंदुत्ववादी संघटनांचा आग्रह होता. काही दिवसांपूर्वी हिंदुत्ववादी संघटना या मुद्यावरून पुन्हा एकदा आक्रमक झाल्या आहेत. वर्षानुवर्षे सुरू असलेली प्रथा बंद करू नये, अशी मागणी या संघटनांनी लावून धरली आहे. मंदिरातील प्राचीन प्रथा आणि परंपरा खंडित होता कामा नयेत, अशी या संघटनांची मागणी आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन साबरीमला मंदिरात महिलांना पूर्वीप्रमाणे प्रवेशबंदी करण्याचा ठराव त्रावणकोर देवस्वम बोर्डाने संमत केला आहे. केरळच्या मतदारांमध्ये हिंदूंची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा कळीचा ठरणार आहे. त्रावणकोर बोर्डाच्या निर्णयाला पाठिंबा देणाऱ्या राजकीय पक्षाला हिंदूंची एकगठ्ठा मते मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्रावणकोर बोर्डाचा हा निर्णय सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# चीन, ब्रिटन आणि स्पेनचा इराणला जाहीर पाठिंबा

पान १ वरून

किती दिवस लढावे लागले तरी चालेल. आम्हाला यश मिळेलच आणि यात यश मिळाले की, जग सुरक्षित होईल.

इस्त्रायलने शिया मुस्लिमांचे सर्वोच्च नेते खामेनी यांना ठार मारल्याचा बदला घेत इराणने आज पवित्र जेरूसलेम शहरावरही विध्वंसक हल्ला केला. यहुदी, मुस्लीम आणि ख्रिश्चनांसाठी जेरूसलेम अत्यंत पवित्र आहे. या हल्ल्यात कितीजण ठार झाले याची माहिती अद्याप उघड झाली नसली तरी या हल्ल्यानंतर जेरूसलेमच्या प्रत्येक रस्त्यावरून सायरन वाजवत रुग्णवाहिका एकामागे एक धावत असतानाचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत.

इराण आक्रमण करीत असतानाच इस्त्रायलनेही इराणवर हल्ले सुरूच ठेवले होते. इस्त्रायलने ओमान खाडीत ११ इराणी जहाजे नष्ट केली, नतांज अणुकेंद्रावर पुन्हा हल्ला केला, हिजबुल्लाहचा गड असलेल्या बेरूतवर क्षेपणास्त्रे डागली.

तेहरान शहरातील प्रशासकीय व रहिवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत, अनेकांना आग लागली आहे, याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले होते. आज इस्त्रायलने आपल्या फौजा दक्षिणी लेबनॉनमध्ये तैनात करून तेथूनही हिजबुल्लाच्या दहशतवादी तळांवर हल्ले केले.

दरम्यान, भारताने वेगवान हालचाली करीत दुबई व इतर राष्ट्रात अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप भारतात आणण्यासाठी एअर इंडिया, इंडिगो, स्टार अलायन्सची विमाने पाठवली आणि आज या पर्यटकांचे भारतात आगमन सुरू झाले.

त्याचवेळी संकटाच्या वेळी भारत आपल्या पाठिशी खंबीरपणे उभा राहिला म्हणून मी भारताचे आभार मानतो, असे इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी जाहीर केले. भारताच्या अधिकृत प्रवक्त्याने शासकीय निवेदन जारी करीत म्हटले की, आखाती प्रदेशात जवळजवळ १ लाख भारतीय आहेत. त्यांची सुरक्षा आमच्यासाठी महत्त्वाची आहे. चर्चा आणि संयम बाळगून हे युद्ध लवकरात लवकर संपवावे, अशी आम्ही विनंती करतो.

# अमेरिकेला जगाचा हुकूमशहा बनायचे आहे

पान १ वरून- की, विरोध करणार हा प्रश्न आहे. भारताला पण चीनची भीती दारवून अमेरिकेला पाठिंबा द्यायला लावतील.

इराणने होर्मुझ स्ट्रेटवर कब्जा ठेवला आहे. याचा भारत व चीनवर गंभीर परिणाम होणार आहे. हे संकट काही महिने घोंघावत राहील. या सर्व युद्धांचा युरोपवर विपरित परिणाम होतो. याचे कारण अमेरिकन गुप्तहेरांनी युरोपची राष्ट्र काबीज केली आहेत. स्पेन वेगळा आहे. फ्रान्स अजुनही राजेशाहीच्या मन:स्थितीत आहे.

हे युद्ध सुरू झाले तेव्हा ट्रम्पची लोकप्रियता केवळ ३७ टक्के होती. दुबई, अबुधाबी ही सुरक्षित स्थळे मानली जात होती. पण आता तसे राहिले नाही. यामुळे त्यांना खूप नुकसान होणार आहे.

# ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत ग्रंथ नव्हेत गोविंदगिरी महाराजांचे वादग्रस्त वक्तव्य

पुणे

**आपल्या** संत परंपरेमध्ये दासबोधच केवळ ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथ भागवत हे ग्रंथ नसून भाष्ये आहेत. तसेच तुकाराम महाराजांची गाथा हे केवळ संकलन आहे, असे वादग्रस्त वक्तव्य स्वामी गोविंदगिरी महाराज यांनी केले. पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानोबा ते तुकोबा या तीन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

गोविंदगिरी महाराजांच्या या वक्तव्यामुळे वाद निर्माण होताच देहू संस्थानाने आपली भूमिका स्पष्ट केली. गोविंद महाराजांनी मांडलेले मत हे त्यांचे वैयक्तिक वक्तव्य आहे. त्यांच्या वक्तव्याशी आम्ही सहमत नाही. महाराष्ट्रातील कोणताही शहाणा माणूस त्यांच्या या वक्तव्याशी सहमत होणार नाही, असे जगद्गुरू संत तुकाराम महाराज संस्थानाचे विश्वस्त आणि तुकाराम महाराजांचे वंशज दिलीप महाराज मोरे यांनी सांगितले. तर देहू संस्थानाचे विश्वस्त वैभव महाराज मोरे म्हणाले की, महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभली आहे. तुकारामांचे अभंग हे पंचम वेद म्हणून अभ्यासले जातात.

# चिनी नायलॉन धाग्याच्या आयातीमुळे सुरतचे कारखाने बंद! कामगार बेकार

■ सुरत

**चीनमधून** मोठ्या प्रमाणावर कमी दर्जाच्या नायलॉन धाग्याची स्वस्त दरात आयात होत असल्यामुळे सूरतमधील तीन प्रमुख उत्पादन प्रकल्प कायमस्वरूपी बंद करावे लागले आहेत. यामुळे २,५०० हून अधिक कामगार बेरोजगार झाले . या क्षेत्रावर अप्रत्यक्षपणे अवलंबून असलेल्या ५०,००० हून अधिक लोकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला आहे. सुरतचा नायलॉन धागा उद्योग कोलमडण्याच्या उंबरठ्यावर आहे.

नायलॉन यार्न स्पिनर्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय मेहरोत्रा आणि सचिव संजय तोडी यांनी आरोप केला की, मागील १४ महिन्यांपासून केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाकडे वारंवार विनंती करूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. आम्ही चीनमधून येणाऱ्या कमी दर्जाच्या नायलॉन धाग्याच्या आयातीवर संपूर्ण बंदी घालण्याची मागणी



करत आहोत. आमचा बाजार या चिनी धाग्याचा डंपिंग ग्राऊंड बनला आहे. या धाग्यांमुळे प्रफुल्ल ओव्हरसीज, जेसीटी आणि जीएसएफसी हे तीन कारखाने बंद झाले. नायलॉन धाग्याच्या उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या या परिसंस्थेला याचा मोठा फटका बसला आहे. अनेक वर्षे काम करणारे कामगार अचानक बेरोजगार झाले असून वाहतूकदार, व्यापारी आणि पुरवठा साखळीशी संबंधित अन्य घटकांनाही याचा फटका बसत आहे. उद्योग क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे की, तातडीने अँटी-डंपिंग शुल्क किंवा आयात निर्बंध लागू केले नाहीत तर आणखी युनिट बंद पडू शकतात. सरकार आत्मनिर्भरतेचा प्रचार करत असताना अनियंत्रित आयातीमुळे देशांतर्गत उत्पादकांना कारखाने बंद करावे लागत आहेत, ही मोठी विडंबना आहे, असे मेहरोत्रा यांनी नमूद केले.

देश विदेश

# अमेरिकेच्या ऑस्टिनमध्ये गोळीबार भारतीय वंशाच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

■ वॉशिंग्टन



**अमेरिकेच्या** टेक्सास राज्यातील ऑस्टिन येथील बुफोर्ड वेस्ट सिक्स्थ स्ट्रीयवर एका हल्लेखोराने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात एका भारतीय वंशाच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. सविता शान (२१) असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. या गोळीबारात रायडर हेरिंग्टन नामक तरुणही मरण पावला, ऑस्टिनच्या पोलीस खात्याने ही माहिती दिली. गोळीबार करणारा हल्लेखोर पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला. हा हल्ला दहशतवादी हल्ला होता का, या दृष्टीने पोलिसांचा तपास सुरू आहे.ऑस्टीन पोलिसांनी हल्ल्यात दोन जण ठार झाल्याचे म्हटले असले तरी प्रत्यक्षात तीन जण ठार झाले असून अनेक जण जखमी झाले आहेत,असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

# पुन्हा भारत-पाक युद्ध होणार? झरदारींच्या वक्तव्याने खळबळ

■ इस्लामाबाद

**भारत** आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भारत आणखी एका युद्धाची तयारी करत असल्याचा दावा झरदारी यांनी पाकिस्तानच्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनात केला. आसिफ अली झरदारी म्हणाले की, भारतातील काही नेते पुन्हा युद्धाची भाषा करत असल्यामुळे प्रादेशिक शांततेला धोका निर्माण होऊ शकतो. आयुष्यभर शांततेचा समर्थक असल्याचे सांगत त्यांनी भारताने संघर्षाचा मार्ग न निवडता संवाद आणि वाटाघाटींना प्राधान्य द्यावे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

युद्ध हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. प्रादेशिक स्थैर्यासाठी अर्थपूर्ण चर्चा हाच योग्य मार्ग आहे. गेल्या वर्षी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाक संबंध तणावपूर्ण झाले होते.

# हरमल लैंगिक अत्याचार प्रकरणात पुराव्याअभावी संशयिताची सुटका

■ पणजी

**इटालियन** महिलेवर झालेल्या कथित लैंगिक अत्याचार प्रकरणातून केरळी युवकाची पुराव्याअभावी निर्दोष सुटका करण्यात आली आहे. पीडित विदेशी महिलेची न्यायालयात उलटतपासणी झाली नसल्याने आणि संपूर्ण खटला परिस्थितीजन्य पुराव्यांवर आधारित असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपीची निर्दोष सुटका केली. हा आदेश पणजी येथील विशेष जलदगती न्यायालयाच्या न्या. पूजा कवळेकर यांनी दिला. पीडित इटालियन महिलेने पेडणे पोलीस स्थानकात १४ जून २०२१ रोजी तक्रार दाखल केली होती.

# फिजिओथेरपिस्ट 'डॉ' कसे? केरळ हायकोर्टात याचिका




■ कोची

**इंडियन** मेडिकल असोसिएशन आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन यांनी फिजिओथेरपिस्टांना वैद्यकीय डॉक्टरांप्रमाणे त्यांच्या नावापूर्वी डॉ. हा उपसर्ग वापरण्यास विरोध करीत केरळ उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. केरळ उच्च न्यायालयाचे न्या. सुष्रुत अरविंद धर्माधिकारी आणि न्या. पी. व्ही. बालकृष्णन यांच्या खंडपीठाने प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रतिवादींना नोटीस बजावली आणि या प्रकरणावर सविस्तर सुनावणी आवश्यक असल्याचे नमूद केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी निश्चित करण्यात आली आहे. केरळ उच्च न्यायालयाचे एकल न्यायाधीश यांनी फिजिओथेरपिस्टांना डॉ. हा उपसर्ग वापरण्याची परवानगी दिली होती. मात्र, इंडियन मेडिकल असोसिएशन आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन यांचे म्हणणे आहे की, एमबीबीएस नसलेल्या फिजिओथेरपिस्टनी डॉ. हा किताब वापरल्यास रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो.

# अफगाणिस्तानचा पाकिस्तानच्या नूर खान हवाई तळावर हल्ला

■ काबूल



**पाकिस्तानमधील** अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या नूर खान हवाई तळावर आज तालिबानने हल्ला केला. हा हवाई तळ रावळपिंडी येथे पाकिस्तानचे लष्करी मुख्यालय आणि पंतप्रधान कार्यालयापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर आहे.

आपल्या सैन्याने ड्युरँड रेषा (दोन्ही देशांतील सीमा) पार करून पाकिस्तानच्या क्वेटा आणि खैबर पख्तुनख्वामधील सैन्यतळांवर हल्ले केले, असा दावाही तालिबानने केला. पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या काबूल, बगराम आणि अन्य शहरांवर हवाई हल्ले केले होते. त्याच्या प्रत्युत्तरादाखल आपण पाकिस्तानमध्ये घुसून हल्ले केले, असे तालिबानने सांगितले.

तर दुसरीकडे पाकिस्तान सरकारने असा दावा केला की, पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हल्ल्यांमध्ये तालिबानचे सुमारे चारशे सैनिक मारले गेले आहेत. शेकडो सैनिक जखमी झाले आहेत.तालिबानच्या १८२ छावण्या उध्वस्त करण्यात आल्या आहेत.तर ३१ छावण्यांवर पाकिस्तानी सैन्याने कब्जा केला आहे. तालिबानचे १८५ रणगाडे आणि सैन्याची अनेक वाहने उद्धस्त करण्यात आली आहेत. ऑपरेश सिंदूरवेळी भारतानेही या हवाई तळावर हल्ला केला होता.

# एपस्टिन फाईलवरून भाजपा-वंचित भिडले

■ भाईंदर

परस्परांविरोधात गुन्हे

**जगभर** गाजत असलेल्या एपस्टिन फाईलच्या मुद्यावर भाईंदरमध्ये भाजपा आणि वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान हाणामारी झाली. यानंतर दोन्ही गटांकडून परस्परांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले.

एपस्टिन फाईलमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव आल्याने वंचित बहुजन आघाडीने आंदोलन पुकारले आहे. भाईंदर रेल्वे स्थानकात या आंदोलनाची पोस्टर पक्षाच्या कार्यकर्त्या अस्मिता कदम लावत होत्या. त्यावेळी भाजपा कार्यकर्ते कृष्णा गुप्ता आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना हटकले. यावेळी दोन्ही गटात हाणामारी आणि बाचाबाची झाली.

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम आणि पुढील व्याज भरण्यात अयशस्वी झाल्यास, पीएफएलला वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवरील प्रतिभूत व्याज लागू करण्यासाठी कलम १३(४) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर पद्धतीने नोटीस बजावण्यासाठी देखील पावले उचलली जात आहेत. आपणास हे नमूद करून कळविण्यात येते की, सरफायसी कायद्याच्या कलम १३(८) मध्ये तपशीलवार सांगितल्याप्रमाणे, जाहीर लिलावासाठी किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी खाजगी कराराची सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही पीएफएल द्वारे केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाण ठेव परत मिळवता येते. लक्षात ठेवा की सरफायसी कायद्याच्या एस-१३(१३) च्या अटींनुसार, तुम्हाला प्रतिभूत मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंधित केले आहे.

**दिनांक: ०४.०३.२०२६, ठिकाण: ठाणे** **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

## महावितरण — ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मधील नोंदणीकृत ठेकेदारांकडून एप्रिल– २०२६ ते मार्च– २०२७ मध्ये सांगली मंडल कार्यालयातंर्गत बाह्यस्त्रोत कंत्राटी पध्दतीने कुशल / अकुशल व तांत्रिक / अतांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याकरीता मागविणेत आलेल्या खालील निविदेची मुदत दि.०३.०३.२०२६ रोजी ००:०५ पासून दि. ०४.०३.२०२६ रोजी २३:५५ वाजेपर्यंत वाढविणेत आलेली आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | विभागाचे नांव | अंदाजे कर्मचारी संख्या | निविदा रक्कम लाखामध्ये | निविदा फी रूपये + GST | इसारा रक्कम रूपये (निविदा रक्कमेच्या ०.५%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | SE/SC/HR/OS/T-13/2025-26 | सांगली मंडल कार्यालय व चाचणी विभाग | २९ | ९२.१९ | रू.५०००/– + GST | ४६०९५.00 |
| २. | SE/SC/HR/OS/T-14/2025-26 | सांगली शहर | २०३ | ६६१.७१ | रू.१००००/– + GST | ३३०८५५.00 |
| ३. | SE/SC/HR/OS/T-15/2025-26 | सांगली ग्रामीण | ३२४ | ९८५.३४ | रू.१००००/– + GST | ४९२६७०.00 |
| ४. | SE/SC/HR/OS/T-16/2025-26 | विटा | २९९ | ९०७.०४ | रू.१००००/– + GST | ४५३५२०.00 |
| ५. | SE/SC/HR/OS/T-17/2025-26 | ईश्वरपूर | २९० | ८८०.७८ | रू.१००००/– + GST | ४४०३९०.00 |
| ६. | SE/SC/HR/OS/T-18/2025-26 | कवठे महांकाळ | २९४ | ८८७.२४ | रू.१००००/– + GST | ४४३६२०.00 |

माहितीसाठी संपर्क : व्यवस्थापक (मासं), महावितरण मंडल कार्यालय, सांगली. मोबाईल क्र. – ७८७५७६९४२२

**एचओपीआर नं. ६६/२०२५–२६** **अधीक्षक अभियंता, मंडल कार्यालय, सांगली**

## महावितरण — जाहीर निवेदन

स्थापत्य विभाग, म. रा. वि. वि. कं. म, कल्याण मधील सर्व एजन्सी व कंत्राटदारांना कळविण्यात येते कि, दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत असलेली एजन्सी व कंत्राटदारांची अनामत रक्कम (Security Deposit) व बयाना रक्कम (Earnest Money Deposit) त्वरित समायोजित करावयाची आहे. त्यामुळे ज्या एजन्सी व कंत्राटदारांची अनामत रक्कम व बयाना रक्कम या कार्यालयात जमा आहे, अशी रक्कम परत हवी असल्यास १५ दिवसांच्या आत (दि.१७ मार्च २०२६) या कार्यालयात सबळ पुराव्यासहित अर्ज करावा. अन्यथा सदर अनामत रक्कम व बयाना रक्कम त्वरित समायोजित करण्यात येईल. त्यानंतर कुठलीही सबब ऐकली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**संपर्क :** श्री. एस. आय. खान उपव्यवस्थापक (वि.व ले.) ८८७९६२९०१८
श्रीमती. साधना ज. भालेराव. सहाय्यक लेखापाल (वि.व ले. ) ८८७९६२९०१९
**पत्ता :** कार्यकारी अभियंता (स्था.) यांचे कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, तेजश्री इमारत, ३ रा मजला, कर्णिक रोड, कल्याण. कल्याण (पश्चिम)–४२१ ३०१.

## कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही **१. श्री. कौशल जगदीश गाला, २. श्री. केवल जगदीश गाला ३. श्री. जगदीश श्यामजी गाला संचालक, मे. सम्यक रियलटीज प्रा. लि., सि.टी.एस. नं. ४९१, ४९१/१ ते ४९१/१८, विलेज पहाडी, सोनावाला क्रॉस रोड नं.२, ऑफ सोनावाला मेन रोड, गोरेगाव, पुर्व, मुंबई – ४०००६३.** सदर जागेवर कोणतीही आस्थापना नसल्यामुळे सदर भुखंड मोकळा असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण प्रभाग यांनी कळविले आहे. या जागेचे **क्षेत्रफळ २१०७.८० चौ. मी.** असून तत्सम गोरेगाव नगर भुमापन कार्यालयातील नोंदीनुसार मिळकतीचे मालक आहोत आणि सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरीदेखील **१. श्री. कौशल जगदीश गाला, २. श्री. केवल जगदीश गाला ३. श्री. जगदीश श्यामजी गाला संचालक, मे. सम्यक रियलटीज प्रा. लि., सि.टी.एस. नं. ४९१, ४९१/१ ते ४९१/१८, विलेज पहाडी, सोनावाला क्रॉस रोड नं.२, ऑफ सोनावाला मेन रोड, गोरेगाव, पुर्व, मुंबई – ४०००६३** या आस्थापनेत पूर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्रांच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पश्चिम) यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी/२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०००५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

**स्थळ–मुंबई**
**दिनांक–०४.०३.२०२६**

**सहि–**
**मे. सम्यक रियलटीज प्रा. लि.,**
**(संचालक)**

(मागील पानावरून चालू)

| अनु. क्र. | गांव का नाम | तालुका | ७/१२ वार भूमि धारक का नाम | सर्वेक्षण क्रमांक | ७/१२ के अनुसार कुलक्षेत्रफल (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सुनिल बापु म्हात्रे | | | |
| | | | जगदिश बापु म्हात्रे | | | |
| | | | अरविंद बापु म्हात्रे | | | |
| | | | सतिष बापु म्हात्रे | | | |
| | | | बाळाराम भिवा म्हात्रे | | | |
| | | | बाबाई अनंता जोशी | | | |
| | | | बारकुबाई सत्यवान मुंढे | | | |
| | | | शोभाबाई बेडुक म्हात्रे | | | |
| | | | लिलाबाई मोहन मढवी | | | |
| | | | शांताबाई नामदेव म्हात्रे | | | |
| | | | सोमनाथ नाना म्हात्रे | | | |
| | | | रोहिदास नारायणलम्हसकर | | | |
| | | | दिपक नारायण म्हसकर | | | |
| | | | शांताराम नागो पाटील | 245/4 | 0.2200 | |
| | | | शांताराम नागो पाटील | 245/5 | 0.1100 | |
| | | | **कुल** | | **16.6955 (हे. आर.)** | **0.6710 (हे. आर.)** |
| | | | **कुल योग** | | **32.3185 (हे. आर.)** | **1.6591 (हे. आर.)** |

(फा. सं. G197/Nilje - Kopar / Usarghar & Bhopar Vlg / 20E)
अवनीश कुमार पाण्डेय, मुख्य प्रशासनिक अधिकारी (निर्माण)

## जाहीर सूचना

मानीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठाच्या आदेशानुसार
सी.पी.(आयबी) क्र. ८३०/एमबी/२०२५

### श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपुत यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदाराचे नाव | **श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपुत** |
| २ | पॅन | AFOPR5438L |
| ३ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | बी-६०३, नीळकंठ गार्डन, जुना ठाणे नाका रोड, ५२ बंगलो, तालुका पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र. |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोच्या वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | २३.०२.२०२६ |
| ५ | ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्र. | श्री. विमल कुमार अग्रवाल, IBBI/IPA-001/IP-P00741/2017-2018/11247 |
| ६ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. जी-४, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, भाईंदर (पश्चिम), ठाणे - ४०११०१. vimal@vpagrawal.in |
| ७ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | कार्यालय क्र. जी-४, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, भाईंदर (पश्चिम), ठाणे - ४०११०१. pgmithilesh@gmail.com |
| ८ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १६.०३.२०२६ |
| ९ | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्धः | (अ) www.ibbi.gov.in/home/downloads • प्रत्यक्ष पत्ताः नोंद क्र. ७ मध्ये असल्यानुसार • आरपी यांना vimal@vpagrawal.in येथे ईमेल करावा. (ब) लागू नाही. |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपुत यांची दि. २३.०२.२०२६ रोजी दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

श्री. मिथिलेश देवप्रकाश राजपुत यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. १६.०३.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी** ठराव व्यावसायिकांना वरील नोंद क्र. ७ मध्ये उल्लेखित पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे.

धनकोंनी त्यांचे पुराव्यासह दावे आणि वैयक्तिक माहिती इलेक्ट्रॉनिक किंवा पुराव्यांसह व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करावे.

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

**श्री. विमल कुमार अग्रवाल**
**ठराव व्यावसायिक**
**नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00741/2017-2018/11247**
**ठिकाणः मुंबई**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# हे तर धोकादायक सूडयुद्ध

**आंतरराष्ट्रीय** स्तरावर शांतता नांदावी यासाठी सगळीच मोठी राष्ट्रे प्रयत्न करीत असतात. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांतला अनुभव लक्षात घेतला तर शांततेसाठी युद्ध हा एक नवा पर्याय किंबहुना अजब पर्याय जगानेच स्वीकारलेला दिसतो. काही राष्ट्रे ही इतकी मदांध आणि धर्मांध असतात की, ज्यांची ओळख हुकुमशहा किंवा दहशतवादी राष्ट्र म्हणूनच करून द्यावी लागते. संपूर्ण देशाची निरंकुश सत्ता आपल्या हातात राहावी म्हणून जगातली बरीच इस्लामिक राष्ट्रे याच हुकुमशाही आणि दहशतवादी मार्गाचा अवलंब करतात. याच वर्चस्ववादातून अनेक वर्षे इराण-इराक युद्ध पेटलेले होते. तर आता इराणला सर्वेसर्वा होण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. विशेषतः पश्चिम आशियामध्ये आपले वर्चस्व ठेवण्यासाठी इराणने असाच धर्मांधपणाचा पर्याय निवडला. आणि अण्वस्त्र तयार करण्याच्या कामालाही सुरुवात केली होती. ही बाब अमेरिकेच्या आणि संयुक्त राष्ट्र संघाच्याही लक्षात आली. या सत्तापिपासू महत्त्वाकांक्षेपासून इराणमधल्या अयातुल्ला खामेनी राजवटीला वेळोवेळी आवाहन केले गेले. परंतु ते यशस्वी झाले नाही. आपली दहशतवादी प्रतिमा कायम ठेवत इराणने वेळोवेळी अमेरिकेशी पंगा घेतला आणि अण्वस्त्र नाहीसे करण्याच्या आव्हानालाही धाब्यावर बसवण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच संतप्त झालेल्या अमेरिकेने आणि इस्त्रायलनेसुद्धा इराणविरुद्ध संयुक्त मोहीम उघडली. हे पहिले असे युद्ध आहे की, ज्यात एखाद्या राष्ट्राचा प्रमुख आणि त्याचे बरेच नातेवाईक ठार करण्याचा प्रकार घडला. खामेनींच्या अंत्ययात्रेला जी गर्दी झाली होती, ती पाहिल्यानंतर अमेरिकेला अपेक्षित असलेले सत्तांतर तिथे कितपत घडून येईल याबद्दलही शंका वाटते. दुर्दैवाने इराणने आणि अरब देशांवर हल्ले केल्याने तो प्रकार म्हणजे इराणने हे युद्ध ओढवून घेण्यासारखेच म्हणावे लागते. जवळपास दहा अरब देशांमधल्या अमेरिकी तळांवर इराणने केलेले हल्ले हे म्हणजे एकाचवेळी अनेक शत्रू निर्माण करण्यासारखे ठरते. ज्या पद्धतीने इराण आणि इतर देशांवर क्षेपणास्त्र डागली जात आहेत ते पाहाता हे शांततेचा उद्देश सोडून एकमेकांविरुद्धचे सूड युद्ध सुरू झाले आहे.

### इराणने ओढवलेले युद्ध

या सगळ्या पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीचा विचार केला तर हे युद्ध लवकर थांबणे अनेक देशांच्या हिताचे ठरते. मात्र ते थांबण्याची चिन्हे दिसत नाही. मुळातच अरब देशांमध्ये असलेला शिया सुन्नींमधला वैरभाव प्रचंड स्वरूपाचा आहे. खामेनी यांची हत्या झाल्याबरोबर अनेक देशांत निदर्शने झाली. पाकिस्तानात कराचीमध्ये थेट अमेरिकन दूतावासच जाळण्याचा प्रयत्न केला गेला. ही घटनादेखील अमेरिकेच्या जिव्हारी लागण्याची शक्यता आहे. इतक्या धर्मांधतेने आणि आक्रमकतेने अमेरिकी कार्याला लक्ष्य करण्याचा निदर्शकांचा प्रयत्न म्हणजे अमेरिकेवरच्या रागाचा हिंसक पद्धतीने बदला घेण्याचा पारंपारिक प्रयत्नच म्हणावा लागतो. यापूर्वीसुद्धा काश्मिरमध्ये अशा प्रकारची निदर्शने झाली होती. परंतु यावेळच्या निदर्शकांना अधिक कठोरपणे लगाम घातला गेला आहे. भारतासारख्या लोकशाही आणि प्रजासत्ताक देशात परकीय राष्ट्रातील कुठल्यातरी घटनेवरून निदर्शने करण्याची प्रवृत्ती धोकादायकच ठरते. यामधून धर्मांधता आणि दहशतवादाचाच पुरस्कार करण्याची मनोवृत्ती पाहायला मिळते. या हल्ल्याचे काही परिणाम भारतावरही होण्याची शक्यता आहे. विशेषतः भारताच्या तेलव्यापारावर मोठा परिणाम होऊ शकतो. म्हणजेच पेट्रोल-डिझेलच्या टंचाईवरून त्याचे भाव वाढण्यापर्यंत परिणाम पाहायला मिळू शकतात. भारताने युद्ध थांबवण्याचे आव्हान केले आहे. युनायटेड अरब अमिरातीवर इराणने केलेल्या हल्ल्याचा निषेध केलेला आहे. प्रामुख्याने या अरब देशांमध्ये तेल व्यापार प्रमुख असल्याने त्याच्या अर्थकारणाला मोठ्या झळा पोहोचू शकतात. भारताची बरीच मोठी तेलआयात याच देशांकडून होत असते. म्हणूनच हे युद्ध लांबणे भारतासाठी फारसे हिताचे नाही. युद्ध थांबवण्यासंदर्भात भारताने केलेले आवाहन अनेक अर्थांनी महत्त्वाचे ठरते. भारताबरोबरचे या सर्व देशांचे संबंध आणि त्याही देशांना पोहोचणाऱ्या युद्धाच्या झळा यामधून सगळ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. एकाअर्थी इराणने अनेक शत्रू निर्माण करून युद्धाची तीव्रता वाढवली. आणि अमेरिकी तळांवर हल्ले केल्याने स्वतःचेही मोठे नुकसान करून घेतले आहे.

### अडकलेले भारतीय


अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांना इराणमध्ये सत्तांतर हवे आहे. तिथल्या परंपरागत शहा घराण्याकडे तिथली सूत्रे जावीत आणि अधिक लोकशाहीयुक्त कारभार तिथे व्हावा यासाठी हे युद्ध महत्त्वाचे असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. परंतु आता प्रत्यक्ष सत्तांतर केव्हा घडून येईल हे सांगता येत नाही. परंतु अमेरिकेविरुद्धचा रोषही इतक्या सहजासहजी थांबण्यासारखा दिसत नाही. युद्धाचा हा आगडोंब उसळला असताना अनेक अरब देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांची सुटका करणे हेदेखील मोठे आव्हान आहे. या सगळ्या अरब देशांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय राहतात. अनेक भारतीय हे पर्यटनाच्यानिमित्ताने अबुधाबी किंवा दुबईत गेलेले आहेत. परंतु हवाई वाहतूकच बंद झाल्याने ते तिथे अडकून पडले आहेत. याचा अर्थ अमेरिकेने अचानकपणे हे युद्ध सुरू केल्याने आणि इराणकडून या अरब देशांवर हल्ले होतील याची कल्पना न आल्याने भारताला आपल्या लोकांसाठी सावधगिरीची सूचना देता आली नाही. याची थोडीफार पूर्वकल्पना आली असती तर अगदी दुबई, अबुधाबी या ठिकाणच्या भारतीय लोकांना परत बोलावून घेता आले असते. ती संधी न मिळाल्याने या अडकलेल्या भारतीयांना परत आणण्याची विशेष मोहीम भारताला राबवावी लागेल. त्या त्या देशांच्या सरकारांना विनंती करून भारतीयांची ही विमाने सुरक्षितपणे उड्डाण करू शकतील याचे आश्वासन मिळवावे लागेल. एकूणच पश्चिम आशियातल्या या अशांततेनेच नव्या अस्थिरतेलाच जन्म दिलेला आहे.

### सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आपल्याला मिळालेल्या यशामुळे लोकांना आपली ओळख होते, तर अपयशामुळे लोकांची ओळख आपल्याला होते.

### पंचांग



बुधवार, ०४ मार्च २०२६
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर

* फाल्गुन कृष्ण प्रतिपदा
नक्षत्र - पूर्वा फाल्गुनी

-: जन्मराशी :-
००-०१ ते १३-४५ सिंह
१३-४६ ते २४-०० कन्या

रवी उदय- ०६-५७
रवी अस्त- १८-४४

अभ्यंगस्नान, ग्रहण करिदन; वसंतोत्सवारंभ, आम्रकुसुम प्राशन, सूर्य पूर्वा भाद्रपदा रात्री १२.५२; औद्योगिक सुरक्षा दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**फॉर्म जी**
**दिल्ली, गुरगाव आणि बेंगलुरू येथे एकात्मिक लॉजिस्टिक्स आणि वाहतूक सेवा उद्योगात कार्यरत**
**ब्लू-स्मार्ट फ्लीट प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| अ.क्र. | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव आणि पॅन आणि सीआयएन/~~एलएलपी क्र.~~ | **ब्लू-स्मार्ट फ्लीट प्रायव्हेट लिमिटेड** सीआयएनः U63090GJ2019PTC106075 पीएएनः AAHCG6384R |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | **नोंद. कार्यालयः** १५ वा मजला, ए ब्लॉक, वेस्टगेट बिझनेस बे, एस जी रोड, जिवराज पार्क, अहमदाबाद, गुजरात, भारत, ३८००५१. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | उपलब्ध नाही |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | आ.व. २०२३-२४ करिता वित्तीय विवरणपत्रानुसार, कंपनीकडे ₹ २४२.१९ लाख रकमेची स्थावर मालमत्ता आहे. तथापि, ठिकाणाचा तपशील आणि प्रत्यक्ष ताबा यांसारखा त्यासंबंधीचा संपूर्ण तपशील सध्या उपलब्ध असलेल्या नोंदींच्या आधारे सध्या उपलब्ध नाही. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | उपलब्ध नाही |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | दि. ३१.०३.२०२४ रोजीच्या अंतिम उपलब्ध लेखापरिक्षित ताळेबंदानुसार उत्पन्न रु. २८,८४४.७१ लाख |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | माहिती उपलब्ध नाही |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, प्रक्रियेच्या पुढील घटनांकरिता संबंधित दिनांक समाविष्ट असलेल्या पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल | blusmartfleet.cirp@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराच्या पात्रता उपलब्ध असलेले यूआरएल : | blusmartfleet.cirp@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | १८.०३.२०२६ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २८.०३.२०२६ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०२.०४.२०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | १२.०४.२०२६ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मूल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | १७.०४.२०२६ |
| १५ | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १७.०५.२०२६ |
| १६ | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | blusmartfleet.cirp@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट ऋणकोच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीचे तपशील | माहिती उपलब्ध नाही |

सही/-
आयपीई-एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड)
द्वारे त्यांचे संचालक, श्री. रितेश प्रकाश अदातिया
ब्लू-स्मार्ट फ्लीट प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात ठराव व्यावसायिक
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021
एएफए वैधता - ३१ डिसेंबर, २०२६
पत्रव्यवहाराकरिता ईमेलः blusmartfleet.cirp@gmail.com

दिनांकः ०३ मार्च, २०२६
ठिकाणः अहमदाबाद



## क्रीडा

# टी-२० वर्ल्डकप पहिली सेमीफायनल आज

## दक्षिण आफ्रिकेसमोर न्यूझीलंडचे मोठे आव्हान

■ कोलकाता -

**टी-२०** विश्वचषक स्पर्धेतील पहिला उपांत्य सामना आज क्रिकेट चाहत्यांसाठी थरारक ठरणार आहे. या स्पर्धेत अपराजित कामगिरी करणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघासमोर बलाढ्य न्यूझीलंडचे आव्हान उभे ठाकले आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण आणि संतुलित खेळ करत दक्षिण आफ्रिकेने दणदणीत कामगिरीच्या जोरावर सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर होणारा हा हायव्होल्टेज सामना भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सुरू होणार आहे. या सामन्यात अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी दोन्ही संघांमध्ये रोमांचक संघर्ष होण्याची शक्यता आहे.

**या स्पर्धेत** एकही सामना न गमावता उपांत्य फेरीत धडक मारणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघाचा आत्मविश्वास सध्या शिगेला पोहोचला आहे. कर्णधार एडेन मार्करम याच्या नेतृत्वात फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत त्यांनी सातत्यपूर्ण कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले आहे. दुसरीकडे, कर्णधार मिचेल सँटनर न्यूझीलंड संघानेही संघर्षपूर्ण कामगिरी करत या फेरीत प्रवेश मिळवला आहे. महत्त्वाच्या सामन्यांमध्ये संयम राखत त्यांनी विजय मिळवले. सेमीफायनलमध्ये दबाव झुगारून देत आक्रमक खेळ करण्याची रणनीती न्यूझीलंडकडून अपेक्षित आहे. न्यूझीलंडच्या फलंदाजांना दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजीसमोर टिकून राहणे हे सर्वात मोठे आव्हान असेल.

**निविदा सूचना**

श्री खडायत भुवन मंडळ मुंबई त्यांच्या हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) येथील मालमत्तेवर कॅटरिंग आणि सजावटीच्या कामासाठी आगाऊ पैसे देऊन प्रस्ताव मागवत आहे. **हा करार ०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०२९ पर्यंत ३ वर्षांच्या कालावधीसाठी असेल.** निविदा फॉर्म श्री खडायत भुवन मंडळ, ३२, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७ यांच्या कार्यालयातून **रु.१,०००/-** भरून ०५.०३.२०२६ पासून उपलब्ध असेल. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०९.०३.२०२६ रोजी सायं.६.०० वा.पर्यंत त्याच कार्यालयात आहे.

विश्वस्त समिती-(२०२६-२०२९)

**महाराष्ट्र शासन**
**उप संचालक (दक्षिण) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय**
Tel. No.022 28860362 E-mail - ddssgnp@gmail.com
**ई-निविदा सूचना**
**पात्रताधारक कंत्राटदाराकडून खाली नमुद केलेल्या कामांकरीता ई-निविदा मागविणेत येत आहेत.**

| Particulars | Details |
|---|---|
| Name of the Works | 1. Providing and fixing paver block od cafeteria canteen near cat orientation at KUN range SGNP Borivali East<br>2. Puchase and set up of Pre-Fabricated watch tower at krishnagiri upvan range of Dy Director (south) SGNP, Borivali<br>3. Purchase and set up of Pre-Fabricated Cottage no.1 and 2 at krishnagiri upvan range of Dy Director (south) SGNP, Borivali<br>4. Repaire to residential Quarter type II of forester and forest guard colony navpada road at krishnagiri upvan range of Dy Director (south) SGNP, Borivali<br>5. Repaire to residential Quarter type of Accountant and main accountant opposite to building no. 8 navpada road at krishnagiri upvan range of Dy Director (south) SGNP, Borivall |
| Address and Concerned person for Correspondence | Deputy Director South<br>Sanjay Gandhi National Park,<br>Address: Borivali East, Mumbai,<br>Maharashtra : 400 066.<br>Phone: 022 2886 0362/ 022-28860389<br>Email:ddssgnp@gmail.com |
| Availability of Tender - Start Date and Time: | 28/02/2026, 14.00 pm |
| Online Bid Submission End Date: | 10/03/2026, 14.00 pm |
| Cost of bid document | Rs. 1120/- (non-refundable) to be paid online through the e-procurement portal |
| Earnest Money Deposit | Rs. 25,000/- online through E-procurement portal, EMD in any other form will not be accepted failing which the tender shall be Rejected summarily. |
| Security Deposit | 2% of the contract value in the form of DD |
| Date and time for opening of Technical Proposal | 11/03/2026, 14.00 pm |
| Date and time for opening of Financial Proposal | To be notified by mail |
| Method of submission of Proposal | Only through e-Procurement portal :<br>Website: https://mahatenders.gov.in |
| Validity of Bids | Minimum 60 days from the due date of submission of proposal as mentioned in this tender or the subsequent corrigendum (if any). |

**अटी व शर्ती**
१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिध्दी आवश्यक असणारी कागदपत्रे शुध्दीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
२. वरील कामाची ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर वरील दिलेल्या कालावधीत असेल.
३. निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम e-payment पध्दतीने स्विकारण्यात येईल.
४. कामाची ई - निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूर्ण कामाची माहिती घेऊन ई-निविदा सादर करावी, नमूद केलेले दर सर्व करांसहित असावेत.
५. कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या ई-निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी राखून ठेवला आहे.
तसेच वनविभागाच्या https://mahaforest.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून ई-निविदा सादर करावे.

सही/-
(किरण पाटील)
उप संचालक (दक्षिण),
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली

क्रमांकःआरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी ६२५०

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE / 2026-27**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | RFx No. | Tender no./year | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender | Tender Fee | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000039086 | 01/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like ERTIGA / Ciaz / Swift Dzire or equivalent vehicle for use of Executive Engineer, EHV (O&M) Dn., Bhandup for the Period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,997.10/- |
| 2 | 7000039087 | 02/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV Mulund substation under EHV (O&M) Division Bhandup for the period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening :-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 3 | 7000039088 | 03/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV Nerul & Sonkhar substation under EHV (O&M) Division Bhandup for period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrsto 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening :-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs( Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 4 | 7000039089 | 04/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo/ ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220 kV AKP & GIS Bhandup substation under EHV (O&M) Division Bhandup for period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs( Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 5 | 7000039090 | 05/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV Kolshet & Colourchem substation under EHV (O&M) Division Bhandup for period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 6 | 7000039091 | 06/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV Trombay substation under EHV (O&M) Division Bhandup for period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 7 | 7000039092 | 07/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo/ ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV Borivali Substation. under EHV (O&M) Division Bhandup for the period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 8 | 7000039093 | 08/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 220kV GIS Pawane / 100 kV Vashi substation under EHV (O&M) Division Bhandup for the period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |
| 9 | 7000039094 | 09/26-27 | SRM 1st call "E-tender for Hiring of A.C. LMV Like Sumo / ERTIGA / Scorpio / Bolero or equivalent vehicle Type for 100kV Nocil Substation under EHV (O&M) Division Bhandup for period 01.04.2026 to 31.03.2027" | Download and submission of tender Documents Date 04.03.2026, 10:00 Hrs to 19.03.2026, 10.00 Hrs. **Technical Opening:-** 19.03.2026,11.00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:-** Dt.19.03.2026 at 12:00 Hrs (Onwards if possible) | Rs. 500/- + applicable GST | Rs. 5,99,990.10/- |

**Contact Person:** The DY Engineer, Mobile No. 9819927988

**Sd/-**
**Executive Engineer, EHV (O&M) Division, Bhandup**

नवा काळ

मुंबई । बुधवार ४ मार्च, २०२६ • पान -८

# राष्ट्रपतींना अयोध्या मंदिरात राम यंत्रासाठी आमंत्रण



**अयोध्या-** अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रित केले नसल्याने त्यावेळी वाद निर्माण झाला होता. मात्र आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १९ मार्च रोजी विशेष धार्मिक विधीअंतर्गत अयोध्या मंदिराच्या गर्भगृहात पवित्र श्रीराम यंत्राची स्थापना करणार असल्याची माहिती मंदिर ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. या धार्मिक कार्यक्रमाची तयारी सुरू झाली असून, १९ मार्च रोजी श्रीराम यंत्र स्थापना पारंपरिक वैदिक विधींमध्ये पारंगत काशीतील नामांकित विद्वानांच्या हस्ते केली जाणार आहे . तेच पूजाविधी आणि संबंधित धार्मिक कार्यक्रमांचे नेतृत्व करणार आहेत. अत्यंत प्रभावशाली अध्यात्मिक प्रतीक मानले जाणारे राम यंत्र मंदिराच्या आत विशेष निश्चित ठिकाणी स्थापित केले जाणार आहे. ज्यामुळे मंदिराची पवित्रता आणि महत्त्व अधिक वृद्धिंगत होईल. या कार्यक्रमात देशभरातील शांतता आणि सलोरव्यासाठी प्रार्थना केली जाणार आहे.

## 'होर्मुज' रोखण्याचा इराणचा इशारा
# कच्च्या तेलाचा भडका उडणार

■ नवी दिल्ली

**अमेरिका** आणि इस्त्रायलने छेडलेल्या युध्दामुळे इराण सरकार आता कच्च्या तेलाच्या बाबतीत जगाची कोंडी करण्याच्या बेतात आहे. होर्मुजची सामुद्रधुनी इराणच्या समुद्री हद्दीत आहे. हा जलमार्ग जगाला कच्चा तेलाचा पुरवठा करणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. अमेरिका आणि इस्त्रायलला धडा शिकवण्यासाठी इराणने हा जलमार्ग रोखण्याचा इशारा दिला आहे.इराणने खरोखरच जर होर्मुज जलमार्ग बंद केला तर कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल शंभर डॉलरच्या पलिकडे जाण्याची शक्यता आहे. इराणने होर्मुजमार्गे कच्च्या तेलाची वाहतूक रोखल्यास त्याचा जगाच्या तेलपुरवठ्यावर दुहेरी परिणाम होणार आहे.

सध्या तेलाच्या निर्यातीचे जे जागतिक करार झाले आहेत ते करार इराणने जलमार्ग रोखल्यास स्थगित करावे लागतील. दुसऱ्या बाजूने तेल संपन्न देशांची संघटना (ओपेक) ज्या कच्च्या तेलाचा साठा जगाच्या इंधन मागणीचे संतुलन राखण्यासाठी करते तो साठा जगभरातील देशांना उपलब्ध होणार नाही. युध्द छेडल्यापासून आतापर्यंत होर्मुजच्या सामुद्रधुनीमध्ये तीन तेलवाहू जहाजांवर हल्ले करण्यात आले. परिणामी ब्रेंट कच्च्या तेलाचे दर आठ टक्क्यांनी वाढून ७८.७२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहेत. तर अमेरिकेकडून पुरवठा केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाचे दर ७.६ टक्क्यांनी वाढले आहेत. याबाबत जर इराणशी तडजोड करता आली नाही तर कच्च्या तेलाच्या जागतिक पुरवठ्यावर गंभीर परिणाम होणार आहेत. कारण या जलमार्गातून जगाच्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यापैकी १५ टक्के तर नैसर्गिक वायूचा २० टक्के पुरवठा होतो.

## ओमानमध्ये बॉम्बस्फोटात भारतीय खलाशाचा मृत्यू

■ ओमान

**ओमानच्या** आखातात मस्कतजवळ ड्रोनच्या सहाय्याने एमकेडी व्योम नावाच्या जहाजावर झालेल्या बॉम्बहल्ल्यात जहाजावरील एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला आहे. अमेरिका-इराण युध्दात बळी गेलेला हा पहिला भारतीय नागरिक आहे. ओमानच्या सरकारी ओमान न्यूजने या वृत्ताला पुष्टी दिली आहे. व्ही शिप्स एशिया या कंपनीचे हे जहाज आहे. बॉम्बस्फोट झाल्यानंतर जहाजाला आग लागली. या आगीत जहाजाच्या इंजिन रुममध्ये काम करत असलेल्या भारतीय खलाशाचा मृत्यू झाला, असे व्ही. शिप्स एशिया कंपनीने सांगितले.

## अमेरिकेने अणुचाचणी केली ?
# इराण व अमेरिकेत भूकंप

■ तेहरान

**अमेरिकेतील** अणुचाचण्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या एरिया ५१ या अतिगोपनीय तळावर आज अमेरिकेने अणूचाचणी केली असे सांगितले जात आहे. या अणूचाचणीमुळे अमेरिका आणि इराणच्या अनेक भागांत एकामागे एक सौम्य भूकंप झाले.

अमेरिकेच्या नेवाडा राज्यातील परिसरात २.५ पेक्षा जास्त तीव्रतेचे १६ सौम्य स्वरूपाचे धक्के नोंदवले गेले. हा परिसर 'एरिया ५२' म्हणून ओळखला जातो. एरिया ५२ आणि त्याच्या शेजारील अधिक



प्रसिद्ध एरिया ५१ हे दोन्ही तळ लास वेगासच्या उत्तरेला असलेल्या लष्करी संकुलाचा भाग आहेत. या दुर्गम भागात अमेरिकन लष्कर प्रायोगिक विमान चाचण्या तसेच अण्वस्त्र संशोधन करत असल्याची चर्चा अनेक दशकांपासून आहे. आज अणूचाचणी झाल्यावर कार्सन सिटी (सुमारे २८८ कि.मी. पश्चिम) आणि लास वेगास (सुमारे २८० कि.मी दक्षिण) येथेही भूकंपाचे धक्के जाणवले. अमेरिकन सरकारकडून पुन्हा अणुस्फोट चाचण्या सुरू झाल्याची कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. अमेरिकेप्रमाणेच इराणच्या भागातही ४.५ रिश्टर क्षमतेचे भूकंपाचे धक्के बसले.

## महाजनांवर राज्यातील लोकांना मदतीची जबाबदारी

■ मुंबई

**आखाती** देशात अडकून पडलेल्या भारतीयांच्या राज्य सरकार संपर्कात आहे. दुबईतील इंडियन पीपल्स फोरमच्या माध्यमातून तेथील भारतीय नागरिकांशी संपर्क साधण्यात येत आहे. अडकून पडलेल्या भारतीयांना सर्वतोपरी मदत केली जाईल. त्यांच्याशी समन्वय साधण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# नेपाळ निवडणुकीत जेन - झी नेते गायब!

■ नेपाळ

नेपाळमध्ये २७५ जागांसाठी ५ मार्च रोजी मतदान होणार असून, सुमारे १ कोटी ९० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मात्र निवडणुकीत सरकारविरोधी आंदोलनातून उदयास आलेले जेन- झी नेते फारसे दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

सप्टेंबरमध्ये जेन झीने सत्ताधाऱ्यांविरोधात रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन केले होते. त्यानंतर नेपाळमध्ये सत्तापालट होऊन सुशीला कार्की यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार सत्तेवर आले. त्यानंतर आता सार्वत्रिक निवडणूक होत आहे. मात्र निवडणुकीत जेन-झी आंदोलनातील नेते कुठेच दिसत नाहीत. या आंदोलनातील प्रमुख चेहऱ्यांपैकी एक टंका धामी नेपाळी कम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीचे सदस्य आहेत. धामी म्हणाले की, काही



राजकारणावर प्रश्नचिन्ह

जण भारतविरोधी प्रचार करतात, पण आम्ही भारतविरोधी नाही. पण गरज पडल्यास पुन्हा आंदोलन करण्यास तयार आहोत. ज्यांच्याशी आमचे विचार जुळतात, त्यांच्यासोबत आम्ही काम करत आहोत. आंदोलनातून आम्ही देशाच्या राजकीय विचारसरणीत बदल घडवण्याचा प्रयत्न केला. बदल एका दिवसात होत नाही. त्यासाठी वेळ आणि राजकीय परिपक्वता आवश्यक असते. आंदोलनातील आणखी एक प्रमुख चेहरा तनुजा पांडे यांनी सांगितले की, यावेळी आंदोलनाशी संबंधित फार कमी नेते निवडणूक लढवत आहेत. नवीन पिढीला अजूनही राजकारणात योग्य स्थान मिळालेले नाही. अनेक राजकीय पक्षांनी आंदोलनाचा वापर करून घेतला आणि नंतर त्याकडे दुर्लक्ष केले, ही बाब निराशाजनक आहे. जेन - झी आंदोलनात बालेन शहा यांचे नाव सर्वाधिक चर्चेत होते.

# बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू भारतात सुखरूप परतली

■ बंगळुरू

**इस्त्रायल-** इराण युद्धामुळे दुबई विमानतळावर अडकलेली भारताची स्टार बॅडमिंटनपटू आणि दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू अखेर सुखरूप भारतात परतली आहे. अनपेक्षित परिस्थितीमुळे तिचे यंदाच्या ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन चॅम्पियनशिप स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. याबद्दल सिंधूने खंत व्यक्त केली आहे. ३ मार्चपासून बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी सिंधू रवाना झाली होती. ती दुबई मार्गे बर्मिंगहॅमला जात असताना इस्त्रायल-इराण संघर्ष तीव्र झाला. या पार्श्वभूमीवर काही काळासाठी हवाई क्षेत्रावर निर्बंध लावण्यात आल्याने ती दुबई विमानतळावरच अडकून पडली. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या अनिश्चिततेनंतर अखेर ती आज बंगळुरू येथील आपल्या घरी सुरक्षित पोहोचली.

घरी परतल्यानंतर सिंधूने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत भावना व्यक्त केली. ती म्हणाली की, मी सुरक्षितपणे घरी परतले आहे.

## दुबईमध्ये सर्वकाही सुरळीत सुरू आहे

■ नवी दिल्ली

दुबईतून भारतीयांना सुखरुप मायदेशी घेऊन आलेले एअर इंडियाचे विमान आज सकाळी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले.

या प्रवाशांशी काही माध्यम प्रतिनिधींनी संवाद साधून आखातातील परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता बहुतांश प्रवाशांनी दुबईत मेट्रो आणि बस सेवा नेहमीप्रमाणे सुरळीत सुरू असल्याचे सांगितले. तसेच आपल्याला सुखरुप मायदेशी परत आणल्याबद्दल एअर इंडियाचे आभार मानले. एका प्रवाशाने आपण आकाशात एक क्षेपणास्त्र भेदताना पाहिल्याचे सांगितले.

# दुबई बंदरावर नोंदणी बंद! कांदा-द्राक्ष कंटेनर अडकले

■ मुंबई

**आखाती** देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा फटका राज्यातील कृषी निर्यातीला बसू लागला असून, नाशिकच्या कांदा आणि द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट (जेएनपीटी) येथे नाशिकमधून पाठवलेले कांदा आणि द्राक्षांचे सुमारे २०० कंटेनर अडकून पडले आहेत. दुबईकडे जाणारी निर्यात थांबल्याने हजारो टन माल खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शनिवारी रात्रीपासून दुबई बंदरावर माल नोंदणी (रजिस्ट्रेशन) प्रक्रिया थांबवण्यात आली आहे.



त्यामुळे जेएनपीटी बंदरात कंटेनरच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, निर्यात प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. आधीच अडचणीत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती आणखी गंभीर ठरत आहे. निर्यात बंद राहिल्यास देशांतर्गत बाजारात मालाचा पुरवठा वाढून कांद्याचे दर कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. साधारणपणे १३ टन क्षमतेचा एक कंटेनर दुबई किंवा इतर मध्य-पूर्व देशांकडे पाठवण्यासाठी सुमारे १८ ते २० लाख रुपये खर्च येतो. यात मालाची किंमत, मजुरी, शिपिंग शुल्क, कंटेनर भाडे, स्थानिक वाहतूक आणि कोल्ड स्टोरेजचा खर्च यांचा समावेश असतो. मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे हे कंटेनर बंदरावरच थांबले असून निर्यात प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

## बगदादमध्ये अमेरिकन दूतावासाबाहेर निदर्शने

■ बगदाद

**इराणचे** सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर जगभरातील शिया समुदायाने त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख आणि संताप व्यक्त केला आहे. इराकची राजधानी बगदाद येथेही मोठ्या प्रमाणावर निदर्शने होत आहेत.

बगदादमधील ग्रीन झोन परिसरात असलेल्या अमेरिकन दूतावासाबाहेर शेकडो इराण समर्थक जमले. त्यांनी इराणी झेंडे फडकावत अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात घोषणाबाजी केली. काही निदर्शकांनी सुरक्षा दलांवर दगडफेकही केली. निदर्शकांची संख्या वाढल्यानंतर सुरक्षा दलांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराचा आणि ग्रेनेडचा वापर केला.

# आखातातील भारतीयांची सुरक्षा प्रथम संघर्ष थांबवा! भारताचे आवाहन

■ नवी दिल्ली

**मध्य** पूर्वेत इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने आपली अधिकृत प्रतिक्रिया दिली. आखाती देशांमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत तणाव कमी करून संबंधित देशांनी संवाद आणि चर्चेचा मार्ग स्वीकाराण्याचे आवाहन भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने केले. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युएई, इस्त्रायल, कुवेत, कतार बहरीन, ओमन, सौदी अरेबिया, जॉर्डन या ८ देशांशी युद्धाबाबत चर्चा केली. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हटले की,२८ फेब्रुवारी रोजी इराण आणि आखाती प्रदेशात सुरू झालेल्या संघर्षाबद्दल आम्ही आमची तीव्र चिंता व्यक्त केली होती. त्या वेळीही भारताने सर्व बाजूंनी संयम बाळगावा, तणाव वाढवणे टाळावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे म्हटले होते. दुर्दैवाने, रमजानच्या पवित्र महिन्यात या प्रदेशातील परिस्थिती लक्षणीय आणि सातत्याने खालावली आहे. गेल्या काही दिवसांत हा संघर्ष फक्त वाढलाच नाही तर इतर देशांतही पसरला आहे. विनाश आणि मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, तर दुसरीकडे जनजीवन आणि आर्थिक गुंतवणूक ठप्प झाली आहे. या क्षेत्राची सुरक्षा आणि स्थैर्य यामध्ये आमचे महत्त्वपूर्ण हितसंबंध गुंतलेले असल्याने आणि एक जवळचा शेजारी म्हणून या घडामोडींमुळे मोठी चिंता निर्माण होत आहे. त्यामुळे, हा संघर्ष लवकरात लवकर संपावा असे आम्ही ठामपणे सांगत आहोत.

# दुबईमध्ये सर्वकाही सुरळीत
## परतलेल्या प्रवाशांचा अनुभव

■ दुबई

**इस्त्रायल** आणि अमेरिकेकडून इराणवर झालेल्या संयुक्त हल्ल्यानंतर मध्य पूर्वेत अनेक भारतीय अडकले आहेत. यातील अनेक भारतीय आज भारतात परतले. मध्य पूर्वेतून आज १५ ते १६ विमाने भारतात आली. त्यातून परतलेल्या भारतीयांनी आपला अनुभव सांगत तिथली परिस्थिती कथन केली. त्यातील दुबईतून परतलेल्या भारतीयांनी, युद्ध सुरू असले तरी दुबईत जनजीवन सुरळीत सुरू असल्याची प्रतिक्रिया दिली.

हर्षिल चोरडिया यांनी सांगितले की, काही भागांत क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांचे आवाज ऐकू यायचे. मात्र शहरातील मेट्रो सेवा, बस वाहतूक आणि अत्यावश्यक सेवा नियमितपणे सुरू होत्या. स्थानिक प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य उपाययोजना केल्यामुळे भीती पसरली नाही. हवाई क्षेत्र तात्पुरते बंद करण्यात आल्याने अनेक आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर परिणाम झाला. पर्यटक तसेच व्यावसायिक दौऱ्यावर गेलेले भारतीय काही काळ दुबईत अडकून पडले होते. काही प्रवाशांना ओमान, मस्कतमार्गे भारतात परतावे लागले. अबुधाबीच्या अमेरिकेच्या दूतावासावर हल्ला झाला. ५०० मिसाईल हल्ले झाल्याचे आम्हाला समजले. सामान्य लोकांना काही त्रास व्हायला नको, यासाठी त्यांनी काळजी घेतली.

अनेक भारतीय पर्यटक किंवा बिझनेस टूरसाठी गेलेले लोक तिथे आहेत. त्यांना

# मुलगा कुवेतमध्ये अडकला! परत आणा
## अभिनेत्री विशाखा सुभेदारांचा व्हिडिओ

■ मुंबई

**अभिनेत्री** विशाखा सुभेदार यांचा मुलगा अभिनय सुभेदार लंडनला जात असताना युद्धजन्य परिस्थितीमुळे त्याचे विमान कुवेतमध्ये उतरवण्यात आले असून, तो तेथेच अडकला आहे. त्याला परत भारतात आणा, असा भावनिक व्हिडिओ शेअर करत विशाखा सुभेदार यांनी महाराष्ट्र सरकार आणि केंद्राकडे मदतीचे आवाहन केले.

अभिनय सुभेदार लंडन येथे शिक्षण पूर्ण करून तो काही काळ भारतात आला होता. तो पुन्हा लंडनला जात होता. कुटुंबीयांनी त्याला विमानतळावर निरोप दिल्यानंतर फोटो आणि व्हिडिओ पोस्ट करण्यात आले होते. पण युद्धामुळे त्याचे विमान

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

नियोजित मार्गाने न जाता कुवेत सिटी येथे उतरवण्यात आल्याने तो तिथेच अडकला. विशाखा सुभेदार आपल्या व्हिडिओत म्हणाल्या की, माझा मुलगा लंडनच्या प्रवासाला निघाला होता. मात्र कुवेतमध्ये लेओव्हर असल्यामुळे त्याचे विमान तिथे उतरवण्यात आले. गेल्या चार दिवसांपासून एअरस्पेस बंद असल्याने अनेक उड्डाणे रद्द झाली आहेत. माझा मुलगा चार दिवसांपासून कुवेतमध्ये अडकला आहे.

सध्या तिथली परिस्थिती गंभीर होत चालली आहे. एअरलाईन आणि इंडियन दुतावासाकडून त्यांची हॉटेलमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. दुबईमध्ये अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यात आले, त्याचप्रमाणे कुवेतमध्ये अडकलेल्या भारतीयांनाही सुरक्षितपणे मायदेशी आणण्याची व्यवस्था करावी.

# १५ हून अधिक देश तत्काळ सोडा
## अमेरिकन नागरिकांना सूचना

■ नवी दिल्ली

**अमेरिका-** इस्त्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आखातात तीव्र तणाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या सरकारने अमेरिकन नागरिकांना मध्य पूर्वेतील सुमारे १५ हून अधिक देश सोडण्याचा इशारा दिला आहे. त्यामध्ये बहारिन, इजिप्त, इराण, इराक, इस्त्रायल, पॅलेस्टाईन, गाझा, जॉर्डन, कुवैत लेबनॉन, ओमान, कतार, सौदी अरेबिया, सीरिया, संयुक्त अरब अमिराती, येमेन यांचा समावेश आहे.

देश सोडण्यासाठी मदत आवश्यक असल्यास नागरिकांसाठी अमेरिकन सरकारने फोन नंबरही जारी केले आहेत. कुवेत आणि सौदी अरेबियातील अमेरिकन दूतावासांवर इराणी ड्रोन हल्ले झाल्यानंतर हा इशारा दिला आहे. काल कुवेत सिटीतील अमेरिकन दूतावासवर हल्ला झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी अमेरिकन नागरिकांना जिथे आहेत तिथेच सुरक्षित राहण्याचा आणि दूतावासात येऊ नये, असे आवाहन केले. आज पहाटे सौदी रियाधमधील अमेरिकन दूतावासावर झालेल्या ड्रोन हल्ल्यामुळे इमारतीचे मर्यादित नुकसान व आग लागल्याचे संरक्षण अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. यापूर्वीच अमेरिकन सरकारने इराण, इराक आणि लेबनॉनसाठी 'लेव्हल ४'चा सावधगिरीचा इशारा जारी करून अमेरिकन नागरिकांना तत्काळ देश सोडण्याची सूचना केली होती.

# जम्मू-काश्मीरमध्ये सलग सातव्या हिवाळ्यात दुष्काळ

पर्जन्यमानात ६५ टक्के घट

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरमध्ये** यंदा सलग सातव्या वर्षी हिवाळ्यात पावसाची तूट नोंदवली गेली असून, एकूण पर्जन्यमानात सरासरीपेक्षा ६५ टक्क्यांची घट झाली आहे. या हिवाळ्यात किश्तवार जिल्हा येथे तब्बल ९० टक्के, तर शोपियान जिल्हा येथे ८२ टक्के पावसाची तूट नोंदवली गेली असून, ही दुष्काळी स्थिती चिंताजनक मानली जात आहे.

हवामानतज्ज्ञ फैजान आरिफ यांनी संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या मुख्य हिवाळी कालावधीत जम्मू-काश्मीरमध्ये सरासरीपेक्षा ६५ टक्के कमी पाऊस झाला. या तीन महिन्यांत प्रदेशात केवळ १००.६ मिमी पर्जन्यमान झाले, इकडे पावसाची सरासरी २८४.९ मिमी आहे. डिसेंबर महिन्यात ७८ टक्के तूट नोंदवली गेली. या महिन्यात फक्त १३.० मिमी पाऊस झाला, तर सरासरी ५९.४ मिमी आहे. जानेवारीत ९५.१ मिमीच्या सरासरीच्या तुलनेत ७३.४ मिमी पाऊस झाला, म्हणजेच २३ टक्के तूट होती. फेब्रुवारी महिन्यात परिस्थिती अत्यंत गंभीर ठरली. या महिन्यात ८९ टक्के तूट नोंदवली गेली. सरासरी १३०.४ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ १४.२ मिमी पाऊस झाला. फेब्रुवारी हा सर्वात कोरड्या महिन्यांपैकी एक ठरला.

# मुंबईत रात्री तीन ठिकाणी छापे
## लॅपटॉप-सीम संशयितांकडून जप्त

■ मुंबई

**प्रतिबंधित** दहशतवादी संघटना इस्लामिक स्टेटच्या कट्टरपंथी प्रचाराला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) ने मुंबईत मोठी धडक कारवाई केली. कुर्ला आणि गोवंडी या गजबजलेल्या भागांतील एकूण तीन ठिकाणांवर एटीएसने एकाच वेळी छापे टाकल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

एटीएसच्या विशेष पथकांनी कुर्ला आणि गोवंडी परिसरातील शिवाजी नगर भागात व्यापक शोधमोहीम राबवली. ही कारवाई मध्यरात्री उशिरापर्यंत सुरू होती. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार काही तरुण डिजिटल प्लॅटफॉर्मचा, विशेषतः एनक्रिप्टेड मेसेजिंग ॲपचा वापर करून आयसिसची कट्टरपंथी विचारसरणी पसरवत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या माहितीची खातरजमा केल्यानंतर एटीएसने संबंधित ठिकाणी नाकाबंदी करून छापेमारी केली.

# विरारच्या अमूल कंपनीत अमोनिया गॅस गळतीमुळे ५ कामगार गुदमरले

■ विरार

**विरारच्या** अमूल कंपनीत आज सकाळी अमोनिया वायुगळती झाली. त्यामुळे ५ कामगार गुदमरले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. देखभाल दुरूस्तीचे काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. वेळीच परिस्थिती आटोक्यात आल्यामुळे पुढील अनर्थ टळला, असे पोलिसांनी सांगितले.

सोमवारी तारापूरच्या रसायन कंपनीतील वायुगळतीची घटना ताजी असतानाच विरारमध्येही अशाच प्रकारची घटना घडली आहे. विरार पूर्वेच्या कण्हेर फाटा येथे प्रसिध्द अमूल या दूध कंपनीचा प्रकल्प आहे. दुधापासून विविध पदार्थ या कंपनीत तयार केले जातात. मंगळवारी कंपनीने प्रकल्पाच्या देखभाल दुरूस्तीचे काम हाती घेतले होते. सकाळी साडेअकराच्या सुमारास अमोनिया गॅसची गळती झाली. त्यावेळी कंपनीत ७० हून अधिक कर्मचारी होते. गॅस गळती झाल्याने एकच खळबळ उडाली. सुरक्षेचा उपाय म्हणून कर्मचाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढले. काही जणांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला. वायूमुळे गुदमरलेल्या ५ कामगारांना गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही वेळाने गॅसगळती थांबविण्यात यश आले.